11.1. Friends, you are aware that UGC had constituted a Pay Review Committee under the Chairmanship of Prof. G.K. Chaddha on 6th Sept, 2007. The Committee submitted its report to UGC on 3rd Oct, 2008 and the UGC furnished its recommendations on 10th Oct, 2008. You are also aware that on 16th Dec, 2008, Minister of State ( H.R.D.) made a statement in Lok Sabha regarding Revision of pay scales of teachers in Universities and Colleges. You are also aware that Govt. of India, Ministry of H.R.D. of Higher Education issued G.R. on 31st Dec, 2008 regarding the "Scheme of revision of pay to teachers and equivalent cadres in Universities and Colleges following the recommendations of pay scales of Central Govt. employees on

# UNIVERSITY GRANTS COMMISSION

**Bahadur Shah Zafar Marg, : New Delhi – 110 002.**

No. F.1. 1-6/2009/PRC  Speed post  February, 2009

To
The Education Secretary
All State Governments (As per List attached)

**Sub :** Scheme of revision of pay of (a) teachers and equivalent cadres and (b) administrative posts in universities and colleges following the revision of pay scales of Central Government Employees on the recommendations of the Sixth Central Pay Commission.

Sir/Madam,

The commission has received orders from the Government of India, Ministry of Human Resource Development, Department of Higher Education, New Delhi vide letter No. 1-32/2006-U.ll/U.(i) and 1-32/2006-U.ll/U.(ii) dated 31st December, 2008 on the above subject and to say that **the State Government may take action to adopt the above Government of India scheme for State Universities and Colleges and payment of pay scales, enhancement of retirement age and release of 40% of the arrears during** the current financial year in accordance with these provisions. The Commission is in the process of finalizing Regulations in Consultation with the stakeholders.

The fitment tables for fixation of salary is likely to be received from the Central Government shortly which will be circulated to all State Governments and Universities and will also be placed on UGC website. **The payment may be made taking an undertaking from every beneficiary under the scheme to the effect that any excess payment made on account of incorrect fixation of pay in the pay band or academic grace pay** shall be adjusted against the future payments due.

**The State Governments may initiate immediate action so that the implementation of this scheme may be in a time bound manner.**

Yours faithfully,
(R.K.Chauhan) Secretary

the recommendations of VIth Central Pay Commission."

11.2. Friends, MFUCTO immediately wrote to the Minister of Higher Education, Maharashtra State vide its communication dated 20th Dec, 2008 for immediate implementation of these revised scales of pay to the University and college teachers in the State of Maharashtra. The issue was also raised by Prof. B .T. Deshmukh, MLC and President of NUTA in the Legislative Council on 29th Dec, 2008. Shri Rajesh Tope, Hon'ble Minister of Higher Education in his statement on the floor of the House had assured that the proposal for implementing these revised scales of pay to University and College Teachers would be placed before the Cabinet simultaneously along with the proposal of revision of pay scales of State Govt. employees. Here again following are the words of the Hon'ble State Minister assuring the House "**त्या समितीचा रिपोर्ट अजून एच.आर.डी. मंत्रालयाला सादर झालेला नाही.** त्यांचा रिपोर्ट आल्यानंतर एच.आर.डी. मंत्रालय आणि यु.जी.सी. जे आदेश काढील त्याचे महाराष्ट्र शासन पालन करील. वेतन आयोगाच्या ज्या शिफारशी आहेत त्याबाबत सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांबाबत ज्यावेळी महाराष्ट्र शासन निर्णय घेईल त्यावेळी शिक्षक आणि उच्च शिक्षण विभागातील जे कर्मचारी आहेत यांचेही त्यांच्याबरोबर करुन घेऊ."

11.3. I would like to bring to the notice of the house that Hakim Committee Report (unformulated) was submitted to the Govt. on 20th December 2008 and after that entire process was completed and the Govt. Resolution was issued on 27th of February 2009. In respect of the "Scheme of revision of pay of teachers and equivalent cadres in universities and colleges following the revision of pay scales of Central Government employees on the recommendations of the Sixth Central Pay Commission." detailed (formulated) resolution was issued (No.1-32/2006-U.II/U.I(i)New Delhi,) by Govt. of India on 31st December 2008.

11.4. On the same date (31.12.2008) it was also communicated by the Govt. of India to the Chief Secretaries of all the States that "**Copies of the said communication were endorsed, among others, to Chief Secretaries of State Governments with clear advice in regard to what the State Governments are expected to do in order to be eligible for Central assistance..... The UGC has, in the meantime, approached MHRD for guidance for preparation of fitment tables for various categories of incumbents.** "

11.5. University Grants Commission also communicated to the Secretary of the Education Department in February as follows :-

## ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

*(Regd. under Act. XXI of 1860)*

### CIRCULAR : 02/2009 : 03.03.09 : Extract

Dear Friends,

You are aware that the last phase of the revision of pay scales of teachers has now been in progress. We are not happy with the pace of progress of the exercise and informed UGC that we do deserve a better deal. As reported in the earlier circular a decision was taken to organize a Protest Dharna at Delhi on 23.02.09 to highlight our demands.

**Protest Dharna program at Jantar Mantar, New Delhi and March to Parliament**

A massive rally was held at Delhi on 23.2.09 by University and College teachers from across the country under the banner of All India Federation of University and College Teachers' Organizations demanding increase in Central assistance for the implementation of revised UGC scales in State universities and colleges and issuance of enabling UGC regulations. More than 5000 teachers from Kashmir to Kanyakumari took part in the Dharna and March to parliament programme. Secretariat members, Office bearers and leaders of affiliates addressed the rally and demanded implementation of the new pay scales through out the country without further delay, 100% central assistance and proper UGC regulations. Sri Sitaram Yechuri MP and Srimati Amritjit Kaur, Secretary AITUC addressed the rally and pledged their support to the demands raised by teachers.

**Meeting with Prof. Thorat, Chairman, UGC**

The AIFUCTO leadership held discussions with Prof. S.K.Thorat, Chairman UGC in the evening. The UGC assured them that the notification on the new Pay Scales will be issued immediately and that regulations will be finalized only after detailed consultations with the teachers' organizations. We suggested that there should be nation wide consultation, on this issue as was done by the Chadha Committee. A detailed memorandum was submitted to the Chairman, UGC in this regard.

**General Secretary's Camp Office in New Delhi**

General Secretary has been maintaining a camp office in New Delhi and mostly staying in New Delhi for regular contact with UGC, MHRD, Members of Parliament and other eminent personalities. Hence all affiliates and others are requested to interact with him in internet mode as far as possible.

**Latest Developments Regarding pay Revision**

The UGC and MHRD issued clarifications and UGC has written to the Education Secretaries of states. But the fitment table is yet to be sent. Mr. Sunil Kumar, JS, MHRD, UGC officials and MR. R.Chakraborty, Deputy **Secretary, MHRD informed that states may claim central share of enhanced expenditure and disburse 40% of arrears among teachers taking an undertaking even without any fitment table.** This point should be taken up with state govts for immediate implementation. However, we demanded that the fitment table must be made available as early as possible. GS is maintaining close contact with all concerned. The issue will be taken up in the next NEC meeting.

**We have received communications from our affiliates of West Bengal and Uttar Pradesh that Govt. Orders for new pay scales have been issued. Congratulations to Govts of West Bengal and Uttar Pradesh and AIFUCTO affiliates. Teachers of Tamilnadu received interim relief of 3 month salary. Congratulations to Govt. and teachers' associations of Tamilnadu.**

**Asok Barman,**
General Secretary

"The commission has received orders from the Government of India, Ministry of Human Resource Development, Department of Higher Education, New Delhi vide letter No. 1-32/2006-U.ll/U.(i) and 1-32/2006-U.ll/U.(ii) dated 31st December, 2008 on the above subject and to say that the State Government may take action to adopt the above Government of India scheme for State Universities and Colleges and payment of pay scales, enhancement of retirement age and release of 40% of the arrears during the current financial year in accordance with these provisions. The Commission is in the process of finalizing Regulations in Consultation with the stakeholders."

11.6. UGC further Communicated by the said February letter to the State Govt. that "The fitment tables for fixation of salary is likely to be received from the Central Government shortly which will be circulated to all State Governments and Universities and will also be placed on UGC website. The payment may be made taking an undertaking from every beneficiary under the scheme to the effect that any excess payment made on account of incorrect fixation of pay in the pay band or academic grace pay shall be adjusted against the future payments due.... The State Governments may initiate immediate action so that the implementation of this scheme may be in a time bound manner."

Friends, we have to keep ourselves ready for the agitation as would be decided by MFUCTO and/or NUTA regarding implementation of UGC pay scales announced by Central Government to the teachers working in Universities and colleges in the State of Maharashtra.

**(12)LANDMARK JUDGEMENT DELIVERED BY HON'BLE BOMBAY HIGH COURT IN WRIT PETITION NO. 5872/2003**.

12.1. Friends, you are aware that Hon'ble Bombay High Court has delivered landmark judgement on 6th May, 2008 with respect to Writ Petition No. 5872 of 2003. This judgement of Bombay High Court has given greatest relief to the backward regions of Vidarbha and Marathawada where mounting backlog exists. Important relevant para of High Court judgement reads as follows:-

"Under Article 371, there is a special responsibility imposed on the Governor to ensure that there is no backwardness in Vidarbha and Marathwada region and the same was constitutional obligation imposed on the Governor, which cannot be frustrated. Governor is fully empowered to make necessary allocation of funds to improve the backward areas like Marathwada and Vidarbha. The directives of the Governor are binding on the State."

12.2. Friends, NUTA has decided to bring out and published Special Bulletin on the landmark judgement delivered by Hon'ble High Court. I am glad to inform this august body that the contribution of our President Prof. B.T. Deshmukh, as one of the petitioners in this petition is praiseworthy. I also admire him for his continuous untiring efforts for removal of backlog of Vidarbha on the floor of the House as MLC. I also express my gratitude to all office bearers of the Society for backlog removal and development, Amravati for their valuable participation towards this cause.

**(13)ORGANISATIONAL ACTIVITIES IN SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY AREA :**

Friends, I am pleased to report this august body regarding organizational activities of Sant Gadge Baba Amravati University area. Dr. Pravin Raghuwanshi, Joint Secretary of NUTA. sought the appointment of Joint Director ( H.E. ), Amravati Region to discuss the pending problems of the Lecturers in Amravat University area. Accordingly, the delegation consisting of Dr. P. Raghuwanshi, Dr. Subhash Gavai, Prof. D. Gudadhe, Dr. V. Bhangadia and Dr. H.S. Lunge met the Joint Director on 23-4-2008 and discussed the problems relating to regular payment of salary, cases of G.P.F. loan, payment of arrears of placement, complaints regarding payments of arrears of Feeder Cadre and pending cases of placement. The Joint Director of the region responded orders were issued to the concerned authorities to resolve the problems. We congratulate our NUTA. activists of Amravati region for having taken initiative to resolve the pending problems of the Lecturers working in Amravati University area.

**(14) TASKS AHEAD**

Friends, It is true that some of our demands have been met by the struggle of NUTA under able leadership of the MFUCTO. However, some of the old issues have remained to be resolved and in the meantime new issues have been thrown up which the teachers have to face such as contractual appointments, commodification of education, starting of self financing courses and institutions and exploitation of teachers and non-teaching staff working in the said system. You are aware that the NUTA is committed to taking up the problems of every section of the teaching community irrespective of their number and strength in the organization. NUTA Executive Committee is aware that it will have big tasks ahead viz

a) Compelling Government to issue G.R. regarding UGC Pay Scales to be implemented with effect from 1-1-2006

b) Oppose the move of the Central Government towards privatization of pension and Gratuity,

c) Fight for implementation of the UGC leave package

d) Justice to NET/SET affected teachers;

e) Compelling government to withdraw orders on contractual appointments,

f) Release of pension to teachers on the date of their retirement.

g) The discrimination caused by the government regarding the date of implementation of fifth pay commission pay scales to the teachers of unaided engineering colleges has also not been done away with. It would be an important task for us to see that justice is done to them;

h) To take up the problems of social work colleges in Maharashtra;

i) To take up the problems of Ayurved College teachers in Maharashtra.

j) Enactment of suitable legislation for providing penalties for non-compliance of the Grievance committee recommendations.

k) Ambani-Birla report alongwith report on National Knowledge Commission has posed a serious challenge before the field of education in general and higher education in particular. It will have to be fought tooth and nail in the years to come.

l) Making SET examination more transparent including unambiguous minimum percentage of mark.

m) Ensure that all the benefits which teachers are given under the central orders are extended to Librarians and Directors of Physical Education.

**(15) MEMBERSHIP OF NUTA :**

The NUTA Membership has reached upto 5200 at the end of year. This year, the increase in membership is 06

I am glad to inform you that NUTA Bulletin has completed 33rd year of its purposeful existence. This year we have circulated 172 pages of NUTA bulletin. If you go through the NUTA bulletin from first to the last page, you will find that NUTA Executive has tried to give up-to-date information to all its members about their problems and how the NUTA Executive particularly its President Prof. B.T. Deshmukh has focused them at Maharashtra Govt. level through the Legislative Council.

I am thankful to the media and their representative both from Nagpur and Amravati area for the coverage of the various events, programmes and the press releases issued from time to time. This report shall not be complete unless I acknowledge the active cooperation and support of all the members of NUTA and also from non-members i.e. University, College and Junior College Teachers in the activities of the Association and response given by them to the various calls given by NUTA from time to time.

Yours
**(Dr. E.H. Kathale)**
Secretary, NUTA

# *प्रा.बी.टी.देशमुख व श्री वसंतराव खोटरे, विधानपरिषद सदस्य यांचे वृत्तपत्रिय निवेदन*

**दिनांक : ६ फेब्रुवारी २००९**

(१) प्राथमिक शिक्षकांपासून तर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांपर्यंत (उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापक यांच्यासह) **सर्व स्तरावरच्या शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करण्याची बाब हकीम समितीने स्पष्टपणे फेटाळून लावली आहे.** हकीम समितीचा अहवाल अधिकृतपणे शासनाने जाहीर केला नसला तरी मंत्रिमंडळाचा निर्णय झाल्यानंतर मुंबईमध्ये सर्व अधिकारी व शासकीय कर्मचा-यामध्ये हा अहवाल जाहीर झाला आहे. या अहवालाच्या परिच्छेद ३.९.२ मध्ये समितीने स्पष्टपणे असे म्हटले आहे की, **"या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून समिती अशा निष्कर्षाप्रत आली आहे की, शिक्षकीय पदांबाबत सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारसी जशाच्या तशा स्वीकारणे शक्य होणार नाही."**

(२) सुकथनकर समितीच्या १९९७ च्या कुप्रसिद्ध अहवालाची सन २००८ ची तेवढीच कुप्रसिद्ध आवृत्ती हकीम यांनी काढली आहे. सुकथनकरांनी निदान त्यांच्या अहवालात "वरीलप्रमाणे सर्वंकष विचार करता, केंद्रीय पाचव्या वेतन आयोगाने, वर विशद केल्याप्रमाणे, केवळ अत्यंत मर्यादित क्षेत्रातील व संख्येने फारच अल्प अशा शिक्षकांकरिता शिफारस केलेल्या उच्च सुधारित वेतनश्रेणी राज्यातील शालेय स्तरावरील फारच मोठ्या संख्येने असलेल्या शिक्षकांसाठी स्वीकारण्याची **शिफारस करणे उचित होणार नाही** असे आम्हास निश्चितपणे म्हणावेसे वाटते. **त्यामुळे आमची अशी शिफारस आहे की,** राज्यातील शिक्षकीय पदांना लागू असलेल्या विद्यमान द्वि/त्रिस्तरीय वेतनश्रेणी आधारभूत मानून त्या आधारे त्यांना समकक्ष अशा तदनुरूप द्वि/त्रिस्तरीय वेतनश्रेणींची शृंखला विहित करण्यात यावी." (पॅरा ४.२६) **या शब्दात शिफारस केली होती.** आपली नेमणूक शिफारस करण्यासाठी झाली आहे याचे भान न राहिल्यामुळे हकीम यांनी "या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून समिती अशा निष्कर्षाप्रत आली आहे की, **शिक्षकीय पदांबाबत सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारसी जशाच्या तशा स्वीकारणे शक्य होणार नाही."** (पॅरा ३.९.२) असा **निर्णयच देवून टाकला आहे.**

(३) प्राथमिक शिक्षकांपासून तर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना (उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापक यांच्यासह) अशी आकसपूर्ण वागणूक देतांना हकीम यांनी आपल्या अधिकाराच्या मर्यादा ओलांडून अहवाल लेखन केले आहे. "राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्या सुधारण्याकरिता राज्य शासनाकडून स्वतंत्र वेतन आयोग नियुक्त न करता केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी वेतन आयोग नियुक्त करील तेव्हा तेव्हा **त्या वेतन आयोगाच्या शिफारसी वरील केंद्र शासनाचे वेतन विषयक निर्णय** (Decisions of the Central Government on the Commission's recommendations in regard to pay scales) **राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतन निश्चितीचे सूत्र देखील केंद्र शासनाप्रमाणे असेल."** असा धोरणात्मक निर्णय डिसेंबर १९७७ मध्ये राज्यशासनाने घेतला होता आजपावेतो या धोरणात्मक निर्णयामध्ये शासनाच्या स्तरावर बदल झालेला नाही.

राज्यशासनाचा उपरोक्त धोरणात्मक निर्णय आजही कायम आहे. तो बदललेला नाही असे असतांना या धोरणात्मक निर्णयानुसार शिफारसी करतांना "केंद्रीय कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतल्यानंतर राज्य शासकीय कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीत **सुधारणा** करण्यासाठी" राज्य शासनाने हकिम यांची २३ सप्टेंबर २००८ च्या शासननिर्णयान्वये नियुक्ती केली होती, याचा त्यांना विसर पडला म्हणा किंवा **'सुधारणा' या शब्दाचा त्यांनी दुरुस्ती** (Amendment) असा गैरलागू व चुकीचा अर्थ घेतला. 'महाराष्ट्र शासन व्यवहार कोश' त्यांनी पाहिला असता तर Improvement हा शब्द त्यांना दिसला असता व सुधार करणे, सुधारणा करणे, उन्नतीच्या दिशेने सुधार करणे, हाच त्यांची नेमणूक करणा-या शासननिर्णयातील **सुधारणा** या शब्दाचा अर्थ आहे हेही त्यांच्या लक्षात आले असते.

(४) सुकथनकरांच्या अहवालाची कुप्रसिद्ध पुनरावृत्ती करतांना खोटी का होईना कारणे देण्याची तसदीसुद्धा हकीमांनी घेतली नाही तर **"यासंदर्भात वेतन सुधारणा समिती, १९९७ ने पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसींच्या आधारावर वेतन सुधारणा सुचवितांना, आपल्या अहवालातील परिच्छेद ४.२१ व ४.२६ मध्ये शिक्षकीय पदांना उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्यातील अडचणी विशद केल्या आहेत."** अशा रीतीने एका वाक्यात आपल्या अपकृत्यांचे त्यांनी समर्थन केले, असे समर्थन करतांना सुकथनकरांचे युक्तिवाद फार मोठ्या प्रमाणात असंतोषास कारणीभूत ठरले होते, याची त्यांना आठवण राहिली नाही व सुकथनकरांच्या शिफारसी कच-याच्या टोपलीत फेकून त्यावेळच्या शासनाने हे तकलादू युक्तिवाद फेटाळून लावले होते व शिक्षकांना न्याय दिला होता याची सुद्धा त्यांना कोणी आठवण करून दिली नाही.

(५) सध्याच्या कंत्राटीकरणाच्या विचारधारेमुळे **हकीम यांची नेमणूक करणा-या शासननिर्णयामध्ये त्यांना १ लक्ष रुपयाला हे कंत्राट (परिश्रमिक) देण्यात आले होते.** सुकथनकरांनी शिक्षकांच्या विषयी नोकरशाहीच्या आकसाची जी मुळ आवृत्ती काढली होती त्याची, एक लक्ष रुपयाची सुपारी घेतल्याच्या थाटात, दिमाखदार दुसरी आवृत्ती काढतांना महाराष्ट्र शासनाच्या धोरणात्मक निर्णयाच्या विरोधात जावून त्यांनी "या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून समिती अशा निष्कर्षाप्रत आली आहे की, शिक्षकीय पदांबाबत सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारसी जशाच्या तशा स्वीकारणे शक्य होणार नाही." असा निष्कर्ष काढला व प्राथमिक शिक्षकांपासून तर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांपर्यंत (उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापक यांच्यासह) **सर्व शिक्षकांना सर्व स्तरावर केंद्र शासनाने लागू केलेली श्रेणी वेतने मोठ्या प्रमाणात कापून काढली व या समस्त शिक्षकवर्गाला कायमचे जायबंदी करुन ठेवले.**

(६) ही कापाकापी किती निर्दयपणे करण्यात आलेली आहे हे पहाण्यासारखे आहे. सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीवर **केंद्र शासनाने** (यापुढे उल्लेख केंद्राने) **प्राथमिक शिक्षकाला मुळ वेतनश्रेणीसाठी दुस-या वेतनपट्ट्यात (पे बँड २ मध्ये) ४२०० रुपये श्रेणी वेतन दिले आहे ते कापून हकीम यांनी त्याला दुस-या वेतन पट्ट्यातुन पहिल्या वेतन पट्ट्यात ढकलून दिले व श्रेणी वेतन २८०० रुपये केले आहे.** वरिष्ठ श्रेणीला केंद्राने ४६०० रुपये श्रेणी वेतन दिले तर हकिमांनी ते ४२०० रुपये केले व निवडश्रेणीला केंद्राने दिलेले ४८०० रुपये श्रेणी वेतन हकिम समितीने ४३०० रुपये केले.

**माध्यमिक शिक्षकाला** केंद्राने मुळ वेतनश्रेणीसाठी दुस-या वेतनपट्ट्यात (पे बँड २ मध्ये) ४६०० रुपये श्रेणी वेतन दिले आहे ते कापून हकीम यांनी ४३०० रुपये केले. वरिष्ठ श्रेणीला केंद्राने ४८०० रुपये श्रेणी वेतन दिले तर हकिमांनी ते ४४०० रुपये केले व निवडश्रेणीला केंद्राने दिलेले ५४०० रुपये श्रेणी वेतन हकिम समितीने ४८०० रुपये केले.

**कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना** केंद्राने मुळ वेतनश्रेणीसाठी दुस-या वेतनपट्ट्यात (पे बँड २ मध्ये) ४८०० रुपये श्रेणी वेतन दिले आहे ते कापून हकीम यांनी ४६०० रुपये केले तर वरिष्ठ श्रेणीला केंद्राने ५४०० रुपये श्रेणी वेतन दिले हकिमांनी ते अबदल ठेवले व **निवडश्रेणीला केंद्राने दिलेल्या ६६०० रुपये श्रेणी वेतनात मोठी कपात करुन हकीम**

**समितीने ते ५७०० रुपये केले.**

(७) शिक्षकांवर आकसाने हकीम यांनी लादलेला हा रक्तपात किती जबरदस्त आहे हे चटकन लक्षात यावे म्हणून सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार केंद्र शासनाने मंजूर केलेला पे बँड व ग्रेड पे तसेच हकीम समितीने शिफारस केलेला पे बँड व ग्रेड पे यांची माहिती देणारा तुलनात्मक तक्ता सोबत ***परिशिष्ट*** म्हणून दिला आहे. स्तंभ १ मध्ये अनुक्रम नंबर असून स्तंभ २ मध्ये शिक्षकीय पद नमूद आहे. त्या पदांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार केंद्र शासनाने लागू केलेला वेतन पट्टा (पे बँड) स्तंभ ३ मध्ये व श्रेणी वेतन स्तंभ ४ मध्ये दिलेले आहे. स्तंभ ५ मध्ये हकीम समिती अहवालाने लागू केलेला पे बँड दिला असून स्तंभ ६ मध्ये हकीम समितीने दिलेले श्रेणी वेतन नमूद आहे.

(८) शिक्षण आणि शिक्षकाच्या नशिबी काय दैवदुर्विलास आहे पहा! दिनांक ४ फेब्रुवारी २००९ रोजी हकीम समितीचा अहवाल मंत्रिमंडळाच्या बैठकीपुढे निर्णयार्थ होता. त्याच दिवशी सकाळच्या दैनिक ‘लोकमत’मध्ये **“थेट मुख्यमंत्र्यांना लोकप्रश्न”** या सदरामध्ये पहिलाच प्रश्न मा. मुख्यमंत्र्यांना विचारण्यात आला, तो पुढील प्रमाणे : “प्राथमिक शिक्षकांचे वेतन इतर शासकीय कर्मचा-यांपेक्षा कमी आहे. ग्रामिण भागात ख-या अर्थाने कष्ट करणा-या या शिक्षकांचे वेतन वाढवावे, ही विनंती.”

अतिशय जिव्हाळ्याने तुम्हा आम्हा सर्वांच्या जाणिवांना स्पर्श करुन जाणारे मा. मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांनी त्या प्रश्नाला दिलेले उत्तर मी शब्दशः नमूद करीत आहे. ते पुढील प्रमाणे :-

“**मुख्यमंत्री** :- प्राथमिक शिक्षकांचे महत्त्व मुलांच्या प्रारंभीच्या शैक्षणिक काळात अतिशय महत्त्वाचे आहे. प्राथमिक स्तरावरील शिक्षण हे मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी व भविष्यातील जडणघडणीसाठी अतिशय उपयुक्त ठरत असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे या काळात त्यांच्यावर झालेले संस्कार व इतर बाबींचे मिळालेले प्रशिक्षण यातून त्याचा पाया मजबूत होत असतो. ही बाब लक्षात घेता नव्या पिढीची पायाभरणी प्राथमिक शिक्षकाला करावी लागते. त्यामुळे त्याला अधिक परिश्रम घ्यावे लागतात. तसेच त्याला आपल्या सर्जनशीलतेचे कौशल्य पणाला लावावे लागते. लहान मुलांचे मानसशास्त्र समजून घेऊन त्याला आपलेसे करून शिक्षणाची गोडी निर्माण करावी लागते. ही बाब लक्षात घेता त्यांना समाधानकारक वेतनही मिळायला हवे, यात दुमत असण्याचे कारण नाही. सहाव्या वेतन आयोगात हा प्रश्न ब-यापैकी सुटेल, अशी मला खात्री आहे.”

(९) स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही बाब लक्षात यायला ६०-६५ वर्षाचा काळ लागावा ही गोष्ट दुर्दैवी असली तरी सहाव्या वेतन आयोगाने मा. मुख्यमंत्र्यांच्या या भावनेला प्रतिसाद देणारी शब्दरचना आपल्या अहवालाच्या परिच्छेद ३.८.२२ मध्ये पुढील शब्दात मांडली आहे. :-

“**3.8.22** In order to attract better Teachers and to retain them in the Government, the Commission is inclined to recommend a higher start for Primary School Teachers. This, along with the restructuring of pay scales being recommended by the Commission, will necessitate restructuring of the existing pay scales of Teachers. **Accordingly**, the **following pay bands and grade pay are recommended for the category of Teachers:-.....**”

(१०) सहाव्या वेतन आयोगाच्या या शिफारसी केंद्र शासनाने मनापासून उचलून धरल्या. इतकेच नव्हे तर काही बाबतीत आणखी सुधारणा केल्या, म्हणजे उन्नत दिशेने सुधार केला. देशभर प्राथमिक शिक्षणाला व शिक्षकाला उन्नतावस्थेला आणण्याच्या या प्रयत्नाला महाराष्ट्राच्या सिमेवर थोपवून धरण्यासाठी हकीम समितीने अतिशय क्षुद्र ढाल वापरली. “**समितीची भेट घेतलेल्या संघटनांनी विशेषतः ग्रामीण भागातील संघटनांनी त्यांच्या पदांची शिक्षकीय पदांबरोबर असलेली पूर्वीची सापेक्षता पूर्ववत करण्याची मागणी केली आहे.**” असे त्यांनी नमूद केले. आपल्या अहवालाच्या परिच्छेद ३.९.२ मध्ये हकीमांनी तोडलेले हे अकलेचे तारे अचंबित करणारे आहेत. ग्रामीण भागातील कोणत्या नायब तहसिलदारांच्या किंवा अन्य कोणी संघटनेने त्यांना अशी विनंती केली होती याचा उल्लेख हकीमांच्या अहवालामध्ये नाही. खरे म्हणजे त्या नायब तहसिलदाराला हकीम असे सांगू शकले असते की, प्राथमिक शिक्षण व प्राथमिक शिक्षकाला उन्नत करण्याच्या राष्ट्रीय प्रवाहात आडवा पडण्यापेक्षा तुला शक्य असेल तर या जन्मात तु प्राथमिक शिक्षक हो, ते शक्य नसेल तर पुढच्या जन्मात हो व या जन्मात तुझ्या मुलाला सांग की नायब तहसिलदार होण्यापेक्षा प्राथमिक शिक्षक हो म्हणून!

(११) “**उच्च शिक्षित व्यक्ती शिक्षकीय पेशा स्विकारुन तेथे कायम राहण्याच्या उद्देशाने सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने केंद्र शासनाकडील शिक्षकांसाठी इतरांच्या तुलनेने उच्च वेतनश्रेणींची शिफारस केली आहे, याची समितीस जाणीव आहे.**” अशी मोठी भंपक शब्दरचना ३.९.२ या परिच्छेदाच्या सुरुवातीस हकीम समितीने वापरली असली **तरी या राष्ट्रीय प्रवाहात प्रसन्न मनाने व आनंदाने सामिल होण्यापेक्षा महाराष्ट्रापुरता हा प्रवाह अडवून धरण्यात हकीम समितीने धन्यता मानली आहे.**

सुकथनकरांच्या कुकथनपर कृतिचा दहा वर्षापूर्वी दाहक अनुभव घेतलेल्या समस्त शिक्षक वर्गाला हकीम समितीच्या या अहवालामुळे निमहकिम खतरेजान म्हणण्याची पाळी आली आहे.

***बी.टी.देशमुख***     ***वसंतराव खोटरे,***
***विधानपरिषद सदस्य***

*परिशिष्ट*

**सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार केंद्र शासनाने मंजूर केलेला पे बँड व ग्रेड पे तसेच हकिम समितीने शिफारस केलेला पे बँड व ग्रेड पे यांची माहिती देणारा तुलनात्मक तक्ता**

| Sl. No. | Post | Govt. of India Pay Band&Grade Pay | | Hakim Committee Recommended | |
|---|---|---|---|---|---|
| | | Pay Band | Grade Pay | Pay Band | Grade Pay |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | Primary School Teacher | PB-2<br>PB-2<br>PB-2 | 4200<br>4600<br>4800 | PB-1<br>PB-2<br>PB-2 | 2800<br>4200<br>4300 |
| 2 | Trained Graduate Teacher | PB-2<br>PB-2<br>PB-2 | 4600<br>4800<br>5400 | PB-2<br>PB-2<br>PB-2 | 4300<br>4400<br>4800 |
| 3 | Post Graduate Teacher | PB-2<br>PB-3<br>PB-3 | 4800<br>5400<br>6600 | PB-2<br>PB-3<br>PB-3 | 4600<br>5400<br>5700 |

*नोट :- केंद्र शासनाचे तपशील दिनांक २९ ऑगस्ट २००८ रोजी प्रकाशित झालेल्या THE GAZETTE OF INDIA : EXTRAORDINARY : PART II-SEC 3 (i) च्या पृष्ठ ४४ वरुन घेतलेले असून हकिम समितीचे तपशिल त्यांच्या अहवालाच्या पृष्ठ ४७ ते ५० वरून घेतलेले आहेत.*

**Note**

(1) Pay Band 1 : 5200-20200
(2) Pay Band 2 : 9300-34800
(3) Pay Band 3 : 15600-39100
(4) Pay Band 4 : 37400-67000

***नेट-सेट पात्रता नसलेल्या साऱ्या शिक्षकांना एका गटातील समजून वागणूक देता येणार नाही. पहिला गट १९९१ ते १९९९ या काळातील आहे, ज्यांना ही पात्रता कायद्याने लागूच केलेली नव्हती हे एक व त्यांच्या नेमणूकासुद्धा तदर्थ नसून आज कायमस्वरुपी झालेल्या आहेत. त्यांची विधिवतरित्या निवडसमितीमार्फत निवड झाली होती व ते विधिमय पात्रता धारक सुद्धा होते.***

प्रा.बी.टी.देशमुख, विधानपरिषद सदस्य, यांचे मा. उच्च शिक्षण मंत्री यांना निवेदन

**प्रा.बी.टी.देशमुख,**
विधानपरिषद सदस्य,
३, सुबोध कॉलनी,
विदर्भ महाविद्यालयाजवळ,
**अमरावती.** - ४४४ ६०४

क्रमांक : 2009 / एलसी/ १
फोन नं. नि. (०७२१) २५३००८०
का.(०७२१) २६६३६४६
**दिनांक** : ०९.०३.२००९

प्रति,
**मा. उच्च शिक्षण मंत्री,**
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय :** नेट-सेट प्रकरणात भ्रष्टाचारी वृत्तीने उथळपणे व थिल्लरपणे काम व विचार करणा-या नोकरशाहीला आवर घालण्याबाबत.

**संदर्भ :** बुधवार, दिनांक १७ डिसेंबर २००८ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेत "सन १९९१ ते १९९९ या कालखंडात व त्यानंतर सुध्दा नेमणुका झालेल्या अधिव्याख्यात्यांना नेट-सेटच्या पात्रतेपासून मुक्तता देण्याचा घेतलेला निर्णय" या विषयाच्या लक्षवेधी सूचनेवरील शासनाचे निवेदन व त्यावर सभागृहात झालेली अनुपूरक चर्चा.

मा. महोदय,

**१.** सन १९९१ पासून तर १९९९ पर्यंत महाराष्ट्र राज्यामध्ये नेटसेट पात्रता परीक्षा विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक म्हणून भरती होण्यासाठी पात्रतेची अट या नात्याने कायद्याने विहित करण्यात आलेली नव्हती, याची आपणाला माहिती झालेलीच आहे. या काळात भरती झालेल्या हजारो प्राध्यापकांचा गेली १७-१८ वर्षे सातत्त्याने छळ चालू असून त्यामुळे निर्माण झालेल्या असंतोषाचा स्फोट होण्यापूर्वी शासनाने याबाबत ताबडतोबीने कृति करणे आवश्यक आहे असे मला वाटते. मंत्री वारंवार बदलतात, विभागाचे सचिव वारंवार बदलतात, या गोष्टीचा फायदा घेवून नेटसेट प्रकरणात भ्रष्टाचारी वृत्तीने, उथळपणे व थिल्लरपणे काम करणाऱ्या व विचार करणाऱ्या नोकरशाहीला आवर घालण्याची कृति हा या एकंदर प्रकरणात महत्वाचा भाग आहे असे मला वाटते.

**२.** संदर्भात नमूद केलेल्या चर्चेमध्ये आपण स्वतः सभागृहामध्ये "या सदंर्भात एक जी.आर. काढणे आवश्यक आहे **तेव्हा या अधिवेशनाचा कालावधी संपण्याच्या अगोदर हा जी. आर. काढण्यात येईल. जर २४ तारखेला अधिवेशन संपणार असेल तर त्या अगोदर जी. आर. काढण्यात येईल.** आपला अधिवेशनाचा कालावधी त्या दरम्यानचा राहील असे वाटते तेव्हा हे अधिवेशन संपण्याच्या अगोदरच हा जी. आर. काढण्यात येईल." असे सांगितले होते. आपण पुढे असेही सांगितले होते की, "यांची स्थाननिश्चिती करणे हा यातील महत्त्वाचा प्रश्न आहे आणि ते कॅसचे काम आहे आणि **हे करिअर ॲडव्हान्समेंट स्कीमच्या संदर्भात हे कॅसचे काम पूर्ण करावयाचे आहे. त्यासाठीदेखील कॅम्प्स घेऊन येत्या दोन महिन्यात पूर्ण करावयाचे आहे. अशा प्रकारे हे एकूण सर्वच काम म्हणजे नियमित करण्याचे काम एक महिन्यात आणि त्यापुढे कॅसचे काम दोन महिन्यात असे तीन महिन्यात पूर्ण करून या सगळ्या प्रश्नांना पूर्णविराम दिला जाईल.**"

**३.** प्रश्न मुळापासून समजून घेऊन आपण जी उत्तरे सभागृहामध्ये दिलीत त्याप्रमाणे अधिवेशन संपण्याच्या आत याबाबतचा शासननिर्णय निर्गमित झाला नाही. मी त्याच वेळी नोकरशाहीने विषयामध्ये नमूद केलेल्या वृत्तीचे जे प्रदर्शन गेली १७-१८ वर्षे महाराष्ट्रात मांडलेले आहे त्याचे तपशिलवार दर्शन आपणाला घडविणारे पत्र लिहावे असे ठरविले होते. नागपूर अधिवेशन संपल्यानंतर काही दिवस आणखी वाट पहावी असे मला वाटले. नोकरशाहीच्या या वृत्तीची जवळून माहिती असतांना अशी वाट पहाण्यात माझी चूकच झाली असे आता मला वाटते. तथापि, उशिरात उशिरा म्हणजे मार्च २००९ च्या अधिवेशनापूर्वी तरी निदान हे सारे तपशिल आपल्यासमोर मांडले पाहिजेत या भावनेने हे पत्र मी आपणास लिहित आहे.

**४.** संदर्भामध्ये नमूद केलेल्या चर्चेमध्ये शासनातर्फे जे लेखी निवेदन प्रसृत करण्यात आले, त्याची तांत्रिकदृष्ट्या जबाबदारी निवेदन करणाऱ्या मा. मंत्रीमहोदयांची असते हे मी मान्य करतो. मात्र प्रत्यक्ष व्यवहार काय असतो? लेखी निवेदन हे नोकरशाहीनी तयार केलेले असते व ते अस्सल कागदपत्रावर व ठाम वस्तुस्थितीवर आधारलेले असावे असे अपेक्षित असते. नोकरशाहीची याबाबतीत काहीच जबाबदारी नसते हे मान्य करता येणार नाही. या लेखी निवेदनाची सुरुवातच मुळात "**दिनांक १९ सप्टेंबर, १९९१ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेनुसार नेट/सेट पात्रता परीक्षा अनिवार्य करण्यात आली होती. परंतु नेट/सेट पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे शासनाकडून वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार अधिव्याख्यात्यांना तदर्थ स्वरुपात मान्यता देण्यात येत होती.**" अशी असून ही सुरुवातीची दोनही वाक्ये संपूर्णपणे असत्याधारित आहेत.

**५.** "**दिनांक १९ सप्टेंबर, १९९१ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेनुसार नेट/सेट पात्रता परीक्षा अनिवार्य करण्यात आली होती.**" हे जे पहिले वाक्य आहे ते सत्य कथन नव्हे. प्रथमतः मा. मंत्रिमहोदयांची व त्यानंतर सभागृहाची पूर्णपणे दिशाभूल करणारे ते विधान आहे. कारण त्याच नोटीफिकेशनच्या परिच्छेद ३ मध्ये हे रेग्युलेशन शिफारशीच्या स्वरुपाचे आहे असे नमूद असून त्या तपशिलाचे पालन न केल्यास काय परिणाम होतील हे त्यात सांगितले आहे. त्या परिच्छेदाचा मथळाच मुळात "Consequences of failure of University to comply with **recommendations** of the Commission as per provision of section 14 of the University Grants Commission Act, 1956" असा आहे.

**६.** खुद्द सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा पुढे या रेग्युलेशनचे तपशिलवार विश्लेषण करणारा दिनांक ८ सप्टेंबर १९९४ रोजी Civil Appeal No. 1819 of 1994, decided on 8-9-1994, in University of Delhi, Appellant v/s Raj Singh and others,

Respondents या प्रकरणात स्पष्टपणे "The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character. " असा निर्णय दिला. या शिफारशींना शिक्षकांनी व शिक्षक संघटनांनी महाराष्ट्रामध्ये कधीही विरोध केला नाही. मग घोडे अडले कोठे? या शिफारशींना कायदेशिर स्वरुप देण्याचे कार्य नोकरशाहीने महाराष्ट्रात १९९९ पर्यंत कधीच पूर्ण केले नाही.

**७.** महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी ११ जानेवारी ते १८ जानेवारी १९८९ या कालखंडात झालेल्या चर्चेच्या शेवटी जे मतैक्य पत्र नोंदविण्यात आले त्याच्या पहिल्याच परिच्छेदात असे नमूद आहे की :- "The Government of India's suggestions on revision of pay scales for teachers in Universities and Colleges dated 17th June, 1987 as amended by subsequent agreement dated 4th and 5th Sept., 1987 and Govt. of India's suggestions dated 22nd July, 1988, would be implemented by the State Government with the recommended scales of pay, including the element of promotion involved therein as a composite scheme w.e.f. 1.1.1986" केंद्र शासनाची व्यवस्था **एक समग्र योजना** म्हणून अमलात आणण्याचे शासनाने एकदा मान्य केल्यानंतर प्रत्यक्ष शासन निर्णय २७ फेब्रुवारी १९८९ ला निर्गमित झाला.

**८.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसारची ही "समग्र योजना" महाराष्ट्रात अमलात आणण्याचा धोरणात्मक निर्णय झाल्यावर त्यांची इमानेइतबारे अम्मलबजावणी करणे हे नोकरशाहीचे काम होते. नेटसेटबाबत नेमके हेच झालेले नाही. **शासकीय अधिकाऱ्यांनी करून ठेवलेल्या गलथानपणाची शिक्षा महाराष्ट्रातील हजारो शिक्षकांनी भोगावी हा या नोकरशाहीचा हट्ट उच्च शिक्षण क्षेत्राचे किती वाटोळे करणार?** एवढाच प्रश्न आहे. नेटसेट बाबतच्या संपूर्णपणे बेकायदेशीर व्यवहारामुळे प्राध्यापकात निर्माण झालेल्या तीव्र असंतोषाला राज्यात मुख्यमंत्री व उच्च शिक्षण मंत्री तोंड देत असतात, तेव्हा पुन्हा ही नोकरशाही गालातल्या गालात हसण्यास मोकळी असते. **मंत्रालयातील नोकरशाहीने कितीही चुका केल्या, कितीहि नियमबाह्य व बेकायदेशीर वर्तन केले तरी त्याचा भोग त्यांना भोगावा लागत नाही, हा आजच्या आमच्या व्यवस्थेचा मोठा गमतीदार भाग आहे.** नेट सेट बाबत काय ठरले होते? नोकरशाहीने करायला पाहिजे होते ते करण्याचे सातत्याने टाळले व करायला नको त्या गोष्टी करण्याचा सातत्याने सपाटा लावला. याबाबतची तपशीलवार माहीती पुढील परिच्छेदातून दिलेली आहे.

**९.** मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या मतैक्यपत्राच्या विरोधात, शासननिर्णयाच्या विरोधात, एका अंडर सेक्रेटरीने पत्ररुपी आदेश काढला की, "नेट सेट परीक्षा उत्तीर्ण केली असेल तरच ३१ मार्च १९९४ नंतर त्यांना सेवेत ठेवण्यात यावे" व तो दुरुस्त करण्यासाठी तत्कालीन मा. मुख्यमंत्री श्री. शरदरावजी पवार यांना त्यांच्या दालनातून सभागृहात यावे लागले, हा लोकशाहीतील चमत्कारच म्हणायला पाहिजे. हा प्रकार १७ मार्च १९९४ रोजी विधानपरिषदेने पाहिला. "जोपर्यंत आपली पर्यायी व्यवस्था होत नाही, तोपर्यंत सिलेक्शन कमिट्यांची निवड प्रक्रिया फायनल राहील. इतकेच नव्हे तर "**२ वर्षानंतर त्यांना कन्फर्म करा**" असे चान्सलर महोदयांच्या मान्यतेचे स्टॅट्यूट आहेत ... माझे म्हणणे असे आहे की, जी टेस्ट आहे, ती रिक्रुटमेंटची एक वेगळी पद्धत आहे. ती पद्धत जोपर्यंत अंमलात येत नाही तोपर्यंत परिनियमानुसार झालेली रिक्रुटमेंट १०० टक्के लॉफूल आहे. माननीय चान्सलर यांच्या सहीने आपण ते ठरविले आहे, जो २७.२.८९ चा जी.आर काढला त्याप्रमाणे स्टॅट्यूट झालेले आहे. या सर्व ॲडर्व्हटाइजमेंट ॲप्रुव्ह झालेल्या आहेत. नियमाप्रमाणे त्या सर्व रिक्रुटमेंट परफेक्टली लॉफूल अशा झालेल्या आहेत. ज्या दिवशी आपण नवीन व्यवस्था, **नवीन अल्टरनेट अरेंजमेंट कराल त्या दिवसापासून ते लागू होईल. सुटेबली रिप्लेसड होईल,** अशी खरी गोष्ट आहे. यामध्ये आज सेवेत असलेले जे शिक्षक आहेत त्यांना मुदत वाढवून देण्याचा प्रश्न नाही. त्यांच्या नेमणूकपत्रामध्ये तसे नाही, त्यांना कधी तसे सांगितले नाही, जाहिरातीमध्ये तसे जाहीर केले नाही.... आज सेवेत असलेल्या लोकांना लागू होत नाही. कारण त्यांचे सिलेक्शन लॉफूल आहे, ते कंडीशनल नाही. लॉ-फुली कॉन्स्टीट्युटेड सिलेक्शन कमिटीच्यामार्फत चान्सलरांच्या स्टॅट्यूटप्रमाणे ते रिक्रुट झालेले आहेत. त्यांना कॉम्पीटन्ट ॲथारिटीची मान्यता आहे. त्यांना ते लागू होत नाही. **सेवेत असलेल्या लोकांना ते लागू करण्याचे आपण या २-४ महिन्यात आदेश काढले ते आपण केंव्हा मागे घेणार असा प्रश्न आहे. याचे माननीय मंत्री महोदय उत्तर देतील काय?**" एवढी माहिती विधानपरिषद सभागृहामध्ये ऐकून घेतल्यानंतर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी "**यापूर्वी शिक्षक झालेले आहेत आणि त्यांना याची आवश्यकता नाही असे सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख सांगत आहेत. जर ती वस्तुस्थिती असेल तर त्यासंबंधीचा अपवाद करण्याची तयारी राहील.**" असे स्पष्ट आश्वासन गुरुवार दिनांक १७ मार्च १९९४ रोजी सभागृहामध्ये दिल्यानंतर "**नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याची दिनांक ३१.३.१९९६ ची मुदत या आदेशाव्दारे काढून टाकण्यात येत आहे.**" अशी तरतूद असलेला शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाला २१ महिन्याचा कालावधी लागला व त्यानंतरचा प्रवास तर आणखीनच विस्मयकारक व विद्रुप आहे.

**१०. जे करायला पाहिजे होते ते केले नाही आणि समझोत्यामध्ये, कायद्यामध्ये, नियमामध्ये, यु.जी.सी.च्या किंवा केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये अंतर्भूत नसलेल्या गोष्टी एकामागून करण्याचा सपाटा आमच्या नोकरशाहीने महाराष्ट्रामध्ये जो सुरू केला तो त्यानंतर सुद्धा थांबला नाही.** "नेट सेट परीक्षा उत्तीर्ण केली असेल तरच ३१ मार्च १९९४ नंतर त्यांना सेवेत ठेवण्यात यावे" असा पहिला हूकुम २ फेब्रुवारी १९९४ च्या शासन पत्रान्वये काढण्यात आला. "३१ मार्च १९९५ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा दुसरा आदेश ७ मार्च १९९४ च्या पत्रान्वये देण्यात आला. त्यानंतर "३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश २० मार्च १९९४ च्या शासन पत्रान्वये देण्यात आला. परिनियमांनी केलेली व्यवस्था पत्राने मोडून काढण्याच्या या प्रकाराने शेकडो शिक्षकांना गेली अनेक वर्षे अत्यंत मानसिक तणावात काढावी लागत आहेत. २ फेब्रुवारी १९९४ ते २० मार्च १९९४ या दोन महिन्याच्या (धड दोन सुद्धा नव्हे) काळातील उच्च शिक्षण विभागाची ही तीन पत्रे पाहिली म्हणजे या साऱ्या प्रकाराची एकंदर हास्यास्पदता लक्षात येते. विशेष असे की पत्रापत्रीचा हा सारा प्रकार केंद्र शासनाच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या, परिनियमांच्या व समझोत्याच्या विरोधात होता.

**११.** मा. मंत्रिमहोदय! नोकरशाहीने आपल्या कर्तव्यात कसूर केली, जे करायला पाहिजे होते ते केले नाही हे आपल्या लक्षात आणून देण्यासाठी मी माझ्या पदरचे काही न सांगता विद्यापीठ अनुदान आयोगाचाच पुरावा देऊ इच्छितो. विद्यमान पात्रतेच्या अटी ऐवजी नविन अटी असलेली व्यवस्था स्थापीत करण्यासाठी काय कृती करावी लागेल, याबाबतच्या तपशीलवार सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्र शासनाला दिलेल्या होत्या. दिनांक १४ मार्च १९९१ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव श्री. वाय.एन. चतुर्वेदी यांनी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण खात्याच्या सचिवांना एक पत्र ( D.O.No. F.4-12/86 NET ) पाठवले त्या पत्रात त्यांनी पुढील सूचना स्पष्टपणे दिलेल्या आढळून येतात :-

"We have not so far received acceptance from your state for setting up such state/regional test. For ensuring acceptable standard of those who get selected as Lecturers in colleges/Universities, setting up such a facility is essential and it would be appropriate that there is no delay in this regard. Specifically the following actions are required:

1. Acceptance by the State Government in consultation with universities of either the UGC-CSIR test (NET) or a State Educational test as a necessary qualification for recruitment as Lecturer in all the Universities/colleges in the State.

2. Amendment of relevant university statutes for prescribing this as a minimum qualification.

3. Prescribing similarly for each private college and including this as a condition in the grant in aid rules for the private Colleges.

4. Amendment of recruitment rules for Government colleges that qualifying in the UGC-CSIR or State/Regional test is a minimum qualification for recruitment as lecturer in Govt. Colleges.

5. Designating an appropriate agency in the State for conducting this test. In many States there are arrangements for conducting pre- medical/pre engineering selection tests. This or some other similar organization could conduct the state regional test without adding to administrative expenses".

यापैकी एकाही सुचनेची अंमलबजावणी आमच्या नोकरशाहीने केली नाही.

**१२.** विद्यमान पात्रतेच्या अटींच्या जागी पात्रतेची नवीन व्यवस्था कशी येते? कशी यावी? कशी येईल? याबाबत ज्योतिष्याला विचारण्याची आवश्यकता नव्हती. महाराष्ट्रातील प्राध्यापक, त्यांच्या संघटना आणि महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये याबाबत कोणताही वादसुद्धा नव्हता. पुर्वोक्त परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांची महाराष्ट्र शासनाने प्रथम पूर्तता करणे आवश्यक होते, पुरेसे पात्र उमेदवार उपलब्ध व्हावे यादृष्टीने "विद्यापीठांशी विचार विनिमय करून नेटशी तुलनीय अशी सेट ही पात्रता परीक्षा महाराष्ट्रामध्ये स्विकारणे व संचालित करणे तसेच त्याबाबतची यंत्रणा ठरविणे" ही विद्यापीठ अनुदान आयोगाची पहिली व पाचवी सूचना होती. त्याबाबत त्या काळात नोकरशाहीच्या पातळीवर आनंदच दिसून येतो. अशी एकही परीक्षा महाराष्ट्रात झालेली नसतांना, "ही परीक्षा पास केली नाही तर तुम्हाला काढून टाकू" असे विक्षिप्त आदेश निघाले. "किमान पात्रता निर्धारित करणाऱ्या परिनियमामध्ये बदल करा" अशी दुसरी सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने केली होती. कायद्याने विहित केलेल्या मार्गाने नेटसेट ही पात्रतेची अट लागू करण्यात १९९१ ते १९९९ या काळात महाराष्ट्रात नोकरशाही संपूर्णपणे अयशस्वी झाली. "संलग्न महाविद्यालयाच्या अनुदान संहितेच्या नियमामध्ये बदल करा" अशी विद्यापीठ अनुदान आयोगाची तिसरी सूचना होती. पहिल्या दोन सूचनांच्या बाबतीत उच्च शिक्षण विभागाने यथोचित कारवाई न केल्यामुळे याबाबतीत सुद्धा या विभागाला काहीही करता आले नाही. परिनियम न बदलता पत्राने पात्रतेच्या अटी जशा बदलण्यात आल्या त्याच धर्तीवर "हे नाही केले तर ते कापा आणि ते नाही केले तर हे कापा" अशा पत्रोपत्री सूचना (अनुदान संहितेत बदल न करता) ए ओ ना किंवा जे डी ना पाठवण्याचा धडाका सतत उच्च शिक्षण विभागाने सुरू ठेवला.

**१३.** नेटसेटच्या पात्रतेच्या अटी महाराष्ट्रातील नोकरशाहीने कायदेशीर माध्यमातून महाराष्ट्रात अमलात आणल्या नाहीत. कायदशीर माध्यमे काय उपलब्ध होती याबाबत आपल्या पदरचे काही न मांडता महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने विद्यापीठ अनुदान आयोगाला दिनांक ३० मार्च २००३ रोजी पाठविलेल्या निवेदनामध्ये परिच्छेद २ मध्ये ते अत्यंत नेटकेपणाने मांडले गेले आहे, तो परिच्छेद उद्धृत करणे मला जास्त श्रेयस्कर वाटते. तो पुढील प्रमाणे :-

"2. LAWFUL INSTRUMENT FOR PRESCRIBING QUALIFICATIONS :

2.1 The Non-Agricultural Universities in Maharashtra, viz, University of Mumbai, SNDT Women's University, University of Pune, Nagpur University, Amravati University, Shivaji University, North Maharashtra University, Dr. Babasaheb Marathwada University and Ramanand Tirth University are governed by the provisions of the Maharashtra Universities Act, 1994. **Section 51(8) of the said Act provides that Recruitment and Qualifications of the teachers of the Universities and the affiliated colleges is to be regulated by Statutes to be made by the Universities.** In case Statutes do not exist or where Statutes exist but they need to be amended, and if in the opinion of the Universities it is likely to take time before new Statutes could be brought into existence or existing Statutes could be amended, Section 14(8) of the Act provides **the Vice Chancellors with powers to issue directions.**

2.2 Section 8(3) of the said Act empowers the State Government to issue **Standard Cod**e for the purpose of securing and maintaining uniform standards by Notification in the official Gazette.

2.3 It may be pointed out that the UGC is fully aware of such provisions in the Universities Act in different States in the country and therefore in all the Regulations/ Notifications that the UGC has been issuing from time to time, the UGC has been emphasizing that it would be necessary for the Universities to make Statutes to implement the UGC Notifications/Regulations."

**१४. अगोदर सक्ती व नंतर सक्ती करणारा नियम, असे करणे बरोबर नाही, अगोदर नियम करून मगच सक्ती करता येईल.** "आम्ही नेटसेट या पात्रता अटींचे समर्थक आहोत, नेटसेटच्या विरोधात नाही पण प्रथम ती लागू करा" ही गोष्ट महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने वारंवार शासनाच्या लक्षात आणून दिली. तर दुसऱ्या बाजूला विधानमंडळ सदस्य या नात्याने गेली अनेक वर्षे आम्ही अनेक सदस्यांनी सभागृहामध्ये वारंवार ही गोष्ट सांगितली आहे. **भरती झालेल्या लोकांना परीक्षा पास करण्यासाठी मुदत वाढवून देण्याचा हा प्रश्नच नाही. भरतीच्या वेळी पात्रतेची अट नियमाने सक्तीची करण्याचा हा प्रश्न आहे.** हे किती तरी वेळा खुद्द सभागृहात शासनाच्या आम्ही लक्षात आणून दिले आहे. त्यातील काही तपशील पुढील प्रमाणे :-

(१) "**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, येथे मुदत वाढवून देणे हा प्रश्नच नाही. ... आज तीनचार हजार लोकांचा प्रश्न आहे आणि जी टेस्ट अजून इन्ट्रोड्युस झालेली नाही **ती टेस्ट पूर्वलक्षी प्रभावाने लावली जात आहे. हे चूक आहे. कोणत्या तारखेपासून मराठी माध्यमातून ही टेस्ट लावायची ते आपण ठरवा. पण त्यापूर्वी आज त्यास शासनाने जो पर्याय मान्य केला आहे त्याप्रमाणे निवड झालेल्या शिक्षकांना ही टेस्ट त्यापूर्वी असणार नाही.** असे स्पष्ट आदेश निर्गमित करण्याची गरज आहे. ते आपण केव्हा करणार आहात? हाच माझा प्रश्न आहे? " *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक १७ मार्च १९९४ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १०१, क्रमांक ३ पृष्ठ ४६-४८)*

(२) "**श्री.बी.टी.देशमुख :** .... माझे म्हणणे असे आहे की, जी टेस्ट आहे. ती रिक्रुटमेंटची एक वेगळी पद्धत आहे. ती पद्धत जोपर्यंत अमलात येत नाही तोपर्यंत परिनियमानुसार झालेली रिक्रुटमेंट १०० टक्के लॉफुल आहे. माननीय चान्सलर यांच्या सहीने आपण ते ठरविले आहे. जो २७ फेब्रुवारी १९८९ चा जी.आर.काढला त्याप्रमाणे स्टॅट्युट झालेले आहे. या सर्व ॲडव्हॅर्टाईजमेंट ॲप्रुव्ह झालेल्या आहेत. नियमाप्रमाणे त्या सर्व रिक्रुटमेंट फरफेक्टली लॉफुल अशा झालेल्या आहेत. ज्यादिवशी आपण नवीन व्यवस्था, नवीन अल्टरनेट ॲरेंजमेंट कराल त्या दिवसापासून ते लागू होईल "सुटेबली रिप्लेस्ड" होईल अशी खरी गोष्ट आहे. **यामध्ये आज सेवेत असलेले जे शिक्षक आहेत त्यांना मुदत वाढवून देण्याचा प्रश्न नाही.** त्यांच्या नेमणूक पत्रामध्ये तसे नाही. त्यांना कधी तसे सांगितले नाही. जाहिरातीमध्ये तसे जाहीर केले नाही, आपण असे म्हणालो की, जेव्हा आमची नवीन पद्धत येईल. मराठी मिडियममध्ये एकही टेस्ट अजूनही कन्डक्ट झाली नाही, म्हणजे अजून ती आली नाही, तेव्हा जुनी पद्धती बदलेल. तोवर १९७७ सालची जुनी निवड प्रक्रिया चालू राहील. तेव्हा त्यांना मुदत वाढवून देण्याचा प्रश्न नाही. ही नवीन व्यवस्था केव्हा सुरु करणार? **आपण १९९६ असे सांगत आहात पण मी म्हणतो की, त्यापूर्वी करा."** *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक १७ मार्च १९९४ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १०१, क्रमांक ३ पृष्ठ ४९-५०)*

(३) "**श्री.शरद पवार :** (मुख्यमंत्री) ..... अध्यक्ष महाराज, याच्यामध्ये आता बरेच प्रश्न निर्माण झालेले दिसतात. खरे म्हटले तर याचा कधीतरी विचार केला पाहिजे. कारण येथे सर्व शिक्षक प्रतिनिधी सन्माननीय सदस्य आहेत. आमच्या सर्वापेक्षा जी.आर. चे नंबर, इतर बारीकसारीक त्यांना माहित आहे. पण या सर्व प्रश्नातून तात्पर्य असे दिसते की, **पर्यायी व्यवस्था करण्याच्या संबंधीची जी काही जबाबदारी आहे ती अद्यापी पार पडलेली दिसत नाही** आणि ती नसताना त्यांची सेवा समाप्तीच्या संदर्भात संकट निर्माण झालेले आहे. राज्य शासनाची भूमिका स्वच्छ राहील की, मराठीची व्यवस्था केल्याशिवाय पर्यायी व्यवस्था होणार नाही हे याठिकाणी सूचविले आहे. तशा प्रकारची तरतूद असेल तर ती केली जाईल आणि **तिसरी गोष्ट म्हणजे जे यापूर्वी शिक्षक झालेले आहेत आणि त्यांना याची आवश्यकता नाही. असे सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख सांगत आहेत. तर ती वस्तुस्थिती असेल तर त्यासंबंधीचा अपवाद करण्याची**

**तयारी,** राहील. फक्त तत्पूर्वी माझी एवढीच सूचना राहिल की, सन्माननीय शिक्षण मंत्री, खात्याचे सचिव आणि आपल्या प्रतिनिधीबरोबर या आठवड्यामध्ये माझ्यासमक्ष बसून याची आम्ही शहानिशा करतो आणि ते म्हणतात तशी प्रकारची सुविधा असेल तर **तशा प्रकारचा अनुकूल निर्णय घेतला जाईल."** *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक १७ मार्च १९९४ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १०१, क्रमांक ३ पृष्ठ ५०)*

(४) "**श्री.बी.टी.देशमुख :** .... युनिव्हर्सिटी ग्रांट कमिशनने यांना रिपिटेडली सांगितले की, तुम्ही तुमच्या राज्यामध्ये नेट-सेट ची व्यवस्था करा. दुसरे असे सांगितले की, कायद्यात हे टाका, परिनियमामध्ये टाका, अध्यक्ष महाराज, आपल्याला माहीत आहे की, परिनियम ५१ (८) प्रमाणे विद्यापीठ करू शकते. **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ चे कलम ८ (३) प्रमाणे स्टँडर्ड कोडच्या माध्यमातून राज्य शासन करू शकते. शासनाने ते आजपर्यंत सुद्धा केलेले नाही. या शिक्षकांच्या सेवाशर्थी या स्टॅट्युटने ठरल्या जातील असे कायद्यामध्ये म्हटले आहे. असे असतांना सुद्धा ही कार्यवाही आजपावेतो पूर्ण केली नाही.** माध्यम लक्षात घेवून एकही परीक्षा महाराष्ट्रात झाली नव्हती आणि त्यांनी हुकूम काढले." *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ९ पृष्ठ ५६)*

*(५)* "**श्री.बी.टी.देशमुख :** ....अध्यक्ष महाराज, या ठिकाणी चर्चा झाली. १७ मार्च १९९४ ला मा. मुख्यमंत्री स्वतः येथे आले आणि त्यांनी स्वतः येथे येवून सांगितले की, "**यापूर्वी शिक्षक झाले त्यांना याची आवश्यकता नाही असे मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुख सांगत आहे ती जर वस्तुस्थिती असेल तर यासंबंधीचा अपवाद करण्याची तयारी राहील. फक्त त्यासंबंधी माझी एवढीच सूचना आहे की, मा. शिक्षण मंत्री, त्या खात्याचे सचिव आणि आपले प्रतिनिधी यांच्याबरोबर समक्ष बसून याची शहानिशा करतो.**" अध्यक्ष महाराज, त्यावेळेला घोषित केल्याप्रमाणे मा. मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली त्याच आठवड्यात, आणि स्पष्ट सांगितले की, "यु.जी.सी. मध्ये हे कोठे आहे ते दाखवा नाही तर काढून टाका." परंतु ब्युरॉक्रसी ने १७-१८ महिने काही केले नाही. त्यानंतर मा. विद्यमान मंत्रिमहोदय आल्यानंतर एमफक्टोची बैठक त्यांनी बोलाविली, चर्चा केली आणि त्यांनी त्यानंतर २२ डिसेंबर १९९५ चे आदेश काढले आणि "३१ मार्च ९६ पर्यंत नेट सेट न केल्यास काढून टाका ही अट काढून टाकली." परंतु आता काय अटी टाकल्या आहेत? अध्यक्ष महाराज, या अटींना ना कराराचा आधार आहे, ना समझोत्याचा आधार आहे, ना युजीसीच्या पत्राचा आधार आहे, ना गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या पत्रात त्याला आधार आहे. या अटी अतिशय दुर्देवी अशा आहे. **संबंध भारतात कोठे नाही असा हा मसाला आहे. याठिकाणी महाराष्ट्राच्या ब्युरॉक्रॉसीचे हे टोटली लोकल प्रॉडक्शन आहे. काय नमुनेदार अटी आहेत पहा, तदर्थ नेमणुका द्या त्यांना, पुढील वेतनवाढ त्यांना देवू नका, त्यांना सेवा ज्येष्ठता देवू नका, त्यांच्या सेवा वरिष्ठ व निवडश्रेणी साठी धरू नका, अशा या अटी आहेत,** माझे असे म्हणणे आहे की, करारामध्ये या अटी कोठेही नाहीत, तुम्ही कराराची दोन पत्रे वाचली. ठरले असे आहे की, पॅकेज म्हणून मान्य करा. परंतु त्या पॅकेजमध्ये तुम्ही म्हणता हे कोठेही नाही, उलट आहे. तुम्ही जे वाचले ते माझ्याजवळ आहे. त्यामध्ये असे आहे की, दोन वर्षाचे वर प्रोवेशन चालणार नाही, कन्फर्मेशन दिले पाहिजे. तुम्ही सांगितले, तदर्थ नेमणुका द्या म्हणून. इन्क्रीमेंट देवू नका. मला कळत नाही हा मसाला तुम्ही आणला कोठून? ज्या चार गोष्टी मी आता सांगितल्या तुमच्या शासन निर्णयातील, **त्या करारामध्ये नाही. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सूचनांमध्ये नाही. तसेच केंद्र सरकारच्या शासन निर्णयात नाही. त्यामुळे या अटी ताबडतोब मागे घेण्यात याव्या. नाही तर त्याचा आधार काय आहे ते सांगावे. कारण हे तुमच्या नोकरशाहीचे लोकल प्रॉडक्शन आहे. तुम्ही घुसाडलेल्या या अटींचे आधार काय ते सांगा?"** *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ९ पृष्ठ ५६-५७)*

(६) "**श्री.बी.टी.देशमुख :** .... महाराष्ट्रात फक्त आमच्या नोकरशाहीने करायला नको ते केले आहे. करायला पाहिजे होते ते केले नाही. काय करायला पाहिजे होते? सभापती महोदय, यु.जी.सी. ने त्यांना जे लिहिले आहे ते मी सांगतो. १४ मार्च १९९१ ला असे लिहिले की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सचिवांनी आमच्या सचिवांना लिहिले "It would be appropriate that there is no delay in this regard. specifically following actions are required Acceptance by the State Government ....." ही पहिली अट आहे व दुसरी अट त्यांनी टाकली "Amendment of relevant university statutes for prescribing this as minimum qualification" १४ मार्च १९९१ ला आमच्या सचिवांना त्यांनी एक पत्र लिहिले त्यानंतर १५ जून १९९३ ला युजीसीच्या सचिवांनी आमच्या सचिवांना पुन्हा पत्र लिहिले व १९९३ मध्ये पुन्हा हेच म्हटले आहे त्यामुळे मी पुन्हा ते वाचून दाखवित नाही. माझे म्हणणे हे आहे की आपण म्हणता ते बरोबर आहे. ८० टक्के असिस्टन्स दिला हे ज्या पत्रांनी दिले **त्यामध्ये नेमणुका तदर्थ हे कुठेच नाही. इन्क्रीमेंट देऊ नका हे कुठेच नाही, सेवा धरू नका हे कुठेच नाही, नेटसेट रिक्रुटमेंट लेव्हलला कायदा करून कंपलसरी क्वॉलिफीकेशन म्हणून तुम्ही प्रिस्क्राइब करा त्यासाठी स्टॅट्युट करा असे म्हटले आहे. ते करा तुम्ही. त्याला आमची मनाई नाही. मी मागेही म्हणालो की, मुदत वाढवू नका, उद्या करा ना?** "Amendment of relevant University statute for prescribing this as minimum qualification" असे युजीसीने म्हटले ते तुम्ही करा तुम्ही कायदा अजूनही केला नाही. कायद्याने जे प्रिस्क्राईब करावयाचे आहे ते न लावता बेकायदेशीरपणे लावणे बरोबर नाही. आणि म्हणून माझे पुन्हा म्हणणे आहे की चार गोष्टी युजीसीच्या कोणत्या पत्रामध्ये आहेत? टेम्परररी या लोकांना वर्षानुवर्षे नेमा. इन्क्रीमेंट देऊ नका हे कुठे आहे युजीसीमध्ये ते सांगा? " *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ९ पृष्ठ ५८)*

*(७)* **श्री.पी.जी.दस्तुरकर :** सभापती महोदय, ३ डिसेंबरला हजारो प्राध्यापकांनी सम्राट हॉटेलपुढे धरणे धरले. नऊ जानेवारीला मास कॅज्युवल लिव्ह घेतली. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी सगळे वाचून दाखविले. माननीय मंत्री महोदयांनी उल्लेख केला म्हणून रिपीट करतो. २७ फेब्रुवारी, १९८९ चा शासन निर्णय आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, तोवर ही जुनीच प्रक्रिया चालू राहिल तर सभापती महोदय, इंग्रजीमध्ये मी पुन्हा रिपीट करतो. you do your duty first and then make it compulsory. हे सुटेबल रिप्लेसमेंट त्या ठिकाणी झाले नसेल तर, ह्या ज्या अटी लावल्या आहेत त्या लावण्याचे काय कारण आहे? त्या अटी रद्द करणार आहात काय? *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ९ पृष्ठ ५९)*

(८) "**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, आम्हाला सवलत वगैरे नको. हा हक्काचा व कायद्याचा प्रश्न आहे. या ठिकाणी चार अटी कोठे आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी ज्या चार अटी लादलेल्या आहेत त्या कोठे आहेत? मध्यवर्ती सरकारने २२ जुलै १९८८ च्या पत्रान्वये २९ अटी घातल्या आहेत त्या आम्हाला मान्य आहेत. त्यामध्ये या अटी कोठे आहेत? २४ महिन्यापेक्षा जास्त काम केल्यानंतर त्यांना कन्फर्म करण्यात यावे असे आहे त्यामध्ये, तर यानी तदर्थ नेमा असा जी.आर. काढला आहे. ही अट त्यामध्ये कोठे आहे? या ठिकाणी केंद्र सरकारने ८० टक्के असिस्टंन्स दिले आहे ते शासन आपल्याला सांगत आहे की नेटसेटची व्यवस्था करा. कायदे बदला. That is the suitable replacement of old system by new system. या ठिकाणी आज आपण ते केलेले नाही. या ठिकाणी स्टॅट्युट न करता सारे चालू आहे. दोन वर्षाने कन्फर्म करा असा परिनियम आहे. त्याबाबतीत आज स्टॅट्युट आहेत म्हणून या शासनाने घातलेल्या अटी या ठिकाणी केंद्र शासनाने वा युजीसीने ज्या अटी घातल्या नाहीत, त्या अटीमध्ये हे नाही. या सरकारने ह्या कोठून काढल्या आहेत? ब्युरॉक्रसीनेच हे सगळे काही केले आहे. मी यापूर्वी म्हणालो ते पुन्हा म्हणू इच्छितो. It is totally local production produced by mantralaya in Maharashtra. हे सरकार मात्र या चार अटी या ठिकाणी टाकू इच्छित आहे. २४ महिने नोकरी केल्यानंतर कन्फर्म करण्यात येते. या ठिकाणी थेट रिक्रुटमेंटला तुम्ही तुमचे कायदे करा. या ठिकाणी केंद्र सरकारने ८० टक्के असिस्टंन्स दिला आहे. म्हणून या ठिकाणी या सरकारने या ज्या चार अटी घातलेल्या आहेत, त्या ताबडतोबीने मागे घेण्याची गरज आहे. **कारण या ठिकाणी केंद्र सरकारच्या अटीचा भंग होत आहे. सभापती महोदय, यातील एकही अट केंद्र शासनाने किंवा युजीसीने घातलेली नाही."** *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ९ पृष्ठ ६०)*

(९) "**श्री.बी.टी.देशमुख :** .... पुणे युनिव्हर्सिटीला नेट-सेट परीक्षा सुरू करण्यासाठी त्यांना एक चपराशी धरून पाच जागा पाहिजे होत्या, त्याकरिता मंत्रालयातील शिक्षण विभागाला मंत्रालयातील वित्त विभागाने १५ महिने मान्यता दिली नाही. हे यांचे कर्तव्य आहे. मग तुम्ही त्यासाठी लोकांना पनिशमेंट कां देता? मंत्रालयातल्या मंत्रालयात एका विभागाची दुसऱ्या विभागाला मान्यता मिळायला १५ महिने लागतात व आम्ही सभागृहात भांडण काढल्यावर मान्यता मिळाली. या ठिकाणी तुम्ही जे करायला नको ते केले आहे या ठिकाणी ज्या अटी आहेत त्यामध्ये हे नाही. **जे करायला नको ते केले आहे आणि जे करायला पाहिजे ते अजूनही करीत नाही."** *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक २३ एप्रिल १९९८ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक २३ पृष्ठ ४४)*

(१०) "**श्री.अशोक मोडक :** ....माझा प्रश्न असा आहे की, जो सहस्त्रो प्राध्यापकांच्या जीवाशी खेळ चालला आहे तेव्हा हे यापूर्वी कां लक्षात आले नाही ? याच्या १४ क्रमांकाच्या परिच्छेदामध्ये सुरवातीला काय म्हटले आहे? यात म्हटले आहे की, या विशिष्ट परिपत्रकामुळे या अगोदरच्या तरतुदी निष्प्रभावित केल्या जातील म्हणजे १९ सप्टेंबर १९९१ व २४ डिसेंबरच्या या दोन तरतुदी आहेत. **परंतु सर्वात शेवटी जो प्रोव्हीजो आहे तो अतिशय महत्वाचा आहे.** "Then requisite minimum qualification" हा जो शब्द समुह आहे. That is to be understood. एकदा आपण हे मान्य केले आहे. एखाद्या व्यक्तीच्या नेमणुकीच्या पहिल्याच दिवशी ज्या कोणत्या क्वालिफिकेशन्स आवश्यक असतील त्यासंबंधी हा प्रोव्हीजो दिला गेला आहे. स्वाभाविकपणे त्या अगोदरच्या तरतूदी निष्प्रभ केल्या जातील असे म्हटले आहे त्यात. हे विसंगत आहे हे सरळ-

सरळ दिसते. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या संदर्भामध्ये आवश्यक क्लॅरिफिकेशन जर डिसेंबरमध्ये मागविले जाते ते या अगोदरच का मागविले नाही ? दुसरा प्रश्न असा आहे की, १९९१ सालापासून या नेटसेटच्या परीक्षांचा घोळ चालूच आहे त्याला प्राध्यापक जबाबदार नाहीत आणि एकाअर्थाने राज्य शासन जबाबदार आहे तर आता राज्यशासनाने हे जे दोन प्रोव्हीजो जोडलेले आहे त्याचा आधार घेवून मा.सदस्य बी.टी.देशमुख म्हणाले त्याप्रमाणे त्याचा नक्की गंभीरपणे विचार करावा." *(महाराष्ट्र विधानपरिषद, कार्यवाही, गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २००० कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १२३, क्रमांक १४ पृष्ठ १४७)*

(११) "**श्री.वसंत काळे :** यू.जी.सी.ने **जो क्लॉज/प्रोव्हीजो केला आहे त्याचा अर्थ शासन चुकीचा काढत आहे** आणि शासन क्लॅरीफिकेशन मागण्याचा खटाटोप करीत आहे. आमचे सचिव त्या ठिकाणी जाऊन आले आणि त्यांनी चर्चा केली असे मा. मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. या चर्चेमध्ये असे काही ठरले आहे काय, शासनाने एक पत्र पाठवावयाचे आणि यांनीच तिकडे जाऊन उत्तर लिहून आणावयाचे आणि पोरांचा बळी घ्यायचा. हे शासन सचिव चालवितात की मंत्री चालवितात असा संभ्रम यामधून निर्माण होतो. त्यांच्या स्टेटमेंटमध्ये त्यांनी असे सांगितले की, सचिव तेथे गेले आणि त्यांनी जे सांगितले त्याचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. मग हे पॅकेज ठरलेले आहे काय? असे कटकारस्थान ठरलेले आहे काय ? महाराष्ट्र शासनाने येथील जनतेला असे सांगितले की, आम्ही याचा परत खुलासा युजीसीकडे मागवितो आणि सचिवांनी जावून युजीसीकडून त्यांना पाहिजे तो खुलासा आणावयाचा. तरी अशा स्वरुपाचे पॅकेज किंवा कट ठरलेला आहे काय ? चुकीचे इंटरप्रिटेशन करुन या पोरांची कत्तल करण्याचा जो उद्योग आहे तो बंद करुन शब्दशः अर्थ घेऊन या प्रोव्हीजो प्रमाणे या १०,००० प्राध्यापकांना आपण कायम करणार आहात काय ?" *(महाराष्ट्र विधानपरिषद, कार्यवाही, गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २००० कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १२३, क्रमांक १४ पृष्ठ १४९)*

**१५. मुदत काय वाढवून देता? हा मुदत वाढविण्याचा प्रश्न नाही. शासनाने कायदा वा नियम करुन विधिवतरित्या विधिमय माध्यमांच्याद्वारे राष्ट्रीय पात्रता परीक्षा सक्तीची करण्याचे पाऊल आणखी मुदत न वाढविता उचलण्याची गरज आहे, हे जसे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने लक्षात आणून दिले तसे आम्ही वेगवेगळ्या विधानमंडळ सदस्यांनी शासनाच्या लक्षात आणून दिले हे वरील अकरा उदाहरणावरून सहज लक्षात येईल.** अधिकृत प्रतिवेदनाच्या तारखा आपण पाहिल्या तर १९९१ पासून तर १९९८-९९ पर्यंत सभागृहात आम्ही याचा सतत पाठपुरावा करित होतो. सन १९९९ च्या डिसेंबर पर्यंत नोकरशाहीने त्यावर कोणतीही कारवाई केली नाही हा याबाबतचा महाराष्ट्रातील काळाकुट्ट इतिहास आहे.

**१६.** संदर्भाधिन चर्चेच्या वेळी शासनाच्या वतीने प्रसृत करण्यात आलेल्या निवेदनामध्ये दुसरे वाक्य "परंतु नेट/सेट पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे शासनाकडून वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार अधिव्याख्यात्यांना तदर्थ स्वरुपात मान्यता देण्यात येत होती. दरम्यान शासनाद्वारे दिनांक २२.१२.१९९५ च्या शासन निर्णयानुसार विहीत निवड समितीने शिफारस केलेल्या परंतु नेट/सेट पात्रता नसलेल्या शिक्षकांना तदर्थ स्वरुपात मान्यता देण्यात येत होती." असे आहे. हे वाक्य सुद्धा संपूर्णपणे असत्यावर आधारित आहे. याबाबत २२ डिसेंबर १९९५ च्या या कुप्रसिद्ध शासन निर्णयाने ज्या करायला नको अशा अनेक तरतुदी केल्या **त्या साऱ्याच्या साऱ्या तरतुदी पुढे शासनाला मागे घ्याव्या लागल्या. त्यात तदर्थ मान्यता देण्याची तरतुद सुद्धा पुढे मरण पावली.** या सर्व बाबी आपल्या लक्षात येण्यासाठी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने आपल्या ७ जानेवारी १९९६ च्या बैठकीत या २२ डिसेंबर १९९५ च्या शासननिर्णयावर प्रतिक्रिया देणाऱ्या जो ठराव केला त्याचा मी आधार घेऊ इच्छितो. ७ **जानेवारी १९९६ च्या बैठकीत मंजूर केलेला हा ठराव महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या सचिवांनी दिनांक ८ जानेवारी १९९६ रोजी सचिव उच्च शिक्षण यांना सादर केला त्याची पोचपावती महासंघाच्या कार्यालयात उपलब्ध आहे.** त्याची फोटोप्रत त्या संघटनेने मला अग्रेषित केलेली होती. तो ठराव शब्दशः पुढील प्रमाणे :-

"**(अ)** नेट-सेट बाबत शासनाची भूमिका विद्यापीठ अनुदान आयोगाच्या, तसेच केंद्र शासनाच्या धोरणाशी व महाराष्ट्र शासनाशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा जो समझोता झाला त्याच्याशी पूर्णपणे विसंगत होती याचा कबुलीजबाबच या २२ डिसेंबर १९९५ च्या शासन निर्णयाने दिलेला आहे. "**नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याची दिनांक ३१.३.१९९६ ची मुदत या आदेशाव्दारे काढून टाकण्यात येत आहे.**" हा शासन निर्णयाच्या परिच्छेद ७ (अ) मधील उल्लेख म्हणजे एमफक्टोने याबाबत घेतलेली भूमिका किती बिनचूक होती याचा पुरावाच आहे. तथापि **तदर्थ स्वरूपाच्या नेमणुका देणे, सेवेत असलेल्या अधिव्याख्यात्यांना नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती करणे, न झाल्यास वार्षिक वेतनवाढ देण्यात न येणे, त्यांची सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विचारात न घेणे, सेवा ज्येष्ठता न देणे या शासन निर्णयातील अटी संपूर्णपणे समझोत्याच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनांच्या सुचनांच्या विरुद्ध आहेत.** त्यामुळे या अटी ताबडतोब मागे घेण्यात याव्या अशी मागणी ही सभा करीत आहे.

**(ब)** केंद्र शासनाच्या २२ जुलै ८८ च्या सूचनांमध्ये व महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासन निर्णयामध्ये 'शिक्षक' व 'उमेदवार' असा स्पष्ट फरक करण्यात आलेला आहे. रिफ्रेशर कोर्सेस शिक्षकांसाठी असून राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही उमेदवारांसाठी आहे. उमेदवारांसाठी असलेल्या अटी शिक्षकांवर लादणे सर्वस्वी गैर आहे." या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या भूमिकेचा पुनरूच्चार करण्यात येत आहे.

**(क)** "नेट-सेट परीक्षा ३१ मार्च १९९४ पर्यंत उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **पहिल्या सोमवारी** काढावयाचा, "३१ मार्च १९९५ पर्यंत नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **दुसऱ्या सोमवारी** काढावयाचा व "३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **तिसऱ्या सोमवारी** काढावयाचा **या स्वतःवर लादून घेतलेल्या विक्षिप्त प्रकारातून उच्च शिक्षण विभागाची आता मुक्तता झालेली आहे ही आनंदाची गोष्ट आहे.**

**(ड)** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनाच्या सूचनांच्या आधारावर झालेल्या **समझोत्याचा भंग करणाऱ्या कोणत्याही अटी स्वीकारण्यास हे कार्यकारी मंडळ ठाम नकार देत आहे.**

**(इ)** कोठारी कमिशनचा अहवाल, डॉ. राधाकृष्णन कमिशनचा अहवाल, सेन समितीचा अहवाल, मेहरोत्रा समितीचा अहवाल, यातून राष्ट्रीय पातळीवर स्थिर झालेल्या विचारमंथनाशी या अटी पूर्णपणे विसंगत असून **उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे हे संपूर्णपणे "लोकल प्रॉडक्शन" आहे ही गोष्ट जाहीर पणे नमूद करणे आवश्यक वाटते.** केंद्र शासनाच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचना यांच्याशी या अटी पूर्णपणे विसंगत आहेत.

**(फ)** तदर्थ स्वरूपाच्या नेमणुका देण्याला राजमान्यता प्रदान करून उच्च व तंत्रशिक्षण विभागाने इतिहासाचे काटे उलटे फिरविलेले आहेत. **अगोदरच शिक्षण क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणावर चाललेल्या दुकानदारीला व भ्रष्टाचाराला "युरिया, सुफला व सुपर फॉस्पेट" या दर्जाचे "तदर्थ नेमणुकांचे" रासायनिक खत पुरविण्याच्या या निंद्य प्रकाराची जेवढी करावी तेवढी निर्भत्सना थोडीच आहे."**

**१७.** राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी सतत ५ दिवस सह्याद्रीवर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी चर्चा करुन केंद्र शासनाच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांप्रमाणेच महाराष्ट्रात अम्मलबजावणी करण्यात येईल असे समझोतापत्रक १९८९ मध्ये लेखी ठरवून दिले. त्यानंतर राज्याच्या मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी केंद्र शासनाच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांप्रमाणेच महाराष्ट्रात अम्मल केला जाईल असे १९९९ मध्ये सभागृहात सांगितले व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी लिखित मतैक्य केले. असे असतांना केंद्र शासनाने व विद्यापीठ अनुदान आयोगाने न लावलेल्या अटी (तदर्थ नेमणुका, बढती न देणे, वेतनवाढ न देणे) महाराष्ट्रातील "डेस्क ऑफीसर" वर्षानुवर्षे लादतात ही मोठ्या अचंब्याची गोष्ट आहे. भ्रष्टाचारी हेतू मनात ठेवून उथळपणे व थिल्लरपणे काम करणाऱ्या नोकरशाहीच्या या वर्तनामुळे मंत्र्यांना केवढ्या नामुष्कीला तोंड द्यावे लागते, यासाठी महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ९ पृष्ठ ६१ वर नोंदविण्यात आलेले गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ रोजी झालेल्या चर्चेचे पुढील अधिकृत प्रतिवेदन पहा :-

"**श्री. अरुण मेहता :** सभापती महोदय माझा हरकतीचा मुद्दा आहे. मा. सदस्य डॉ. अशोक मोडक, मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुख आणि इतर सहकारी सातत्याने हा मुद्दा मांडीत आहेत की, जे ८० टक्के असिस्टन्स मिळते त्याच्याकरिता केंद्र सरकारने किंवा युजीसी ने अटी घातलेल्या नाहीत, त्या अटी महाराष्ट्र सरकार कशा घालू शकते? ज्या अटी घातल्या आहेत त्यांना अनुलक्षून अटी घातल्यावर त्याला कुणाचाही विरोध नाही. आपणही त्या विषयी विचारले आहे. तेव्हा पहिल्यांदा ज्या कोणत्या ८० टक्के असिस्टन्सच्या संदर्भात अटी असतील तर त्या समोर येवू द्या. याला कारण असे की एका बाजूला सातत्याने सांगितले जाते की या अटी नाहीत आणि परिच्छेदच्या परिच्छेद उद्धृत करतांना माणसे दिसतात. दुसऱ्या बाजूने आपण म्हणता की त्यामध्ये ८० टक्के असिस्टन्सच्या संदर्भात अटी आहेत. त्या वाचून दाखविणे क्रमप्राप्त आहे. म्हणून माझा हरकतीचा मुद्दा असा की, या अटी सभागृहासमोर आल्या की, सेटनेटच्या संदर्भात सर्व सेटराईट होईल.

**श्री. दत्ता राणे :** त्या अटी आता माझ्याजवळ नाहीत त्या मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**श्री. अरुण मेहता :** तर मग लक्षवेधी सूचना राखून ठेवा.

(गोंधळ)

**उपसभापती :** माननीय सदस्य नेमका प्रश्न असा विचारीत आहेत की युजीसी कडून, केंद्र सरकारकडून वाढीव पगारासाठी ८० टक्के अनुदान येते त्याबाबतीत कोणत्याही प्रकारच्या अटी नाहीत असे ते अतिशय खात्रीपूर्वक ठामपणे सांगत आहेत. अशाप्रकारच्या कोणत्याही अटी युजीसीच्या परिपत्रकामध्ये नाहीत आणि आपण सांगत आहात त्या अटी आहेत परंतु त्या माझ्याजवळ आता नाहीत.

**श्री.दत्ता राणे :** सभापती महोदय, याबाबत शासनाला युजीसीबरोबर कन्सल्ट करावे लागेल. त्यानंतर यासंबंधी निर्णय घेतो."

**१८.** केंद्र शासनाप्रमाणे व युजीसी प्रमाणे करू असे ठरल्यानंतर सुद्धा शिक्षकांच्या जीवनाचे वाटोळे करणाऱ्या अटी आपण लादतो. त्या अटी केंद्राकडून आलेल्या आहेत की नाहीत याची माहितीसुद्धा अधिकारी मंत्रिमहोदयांना देत नाहीत व सभागृहात मंत्र्यांची फजिती होत असतांना गॅलरीत बसलेले अधिकारी गालातल्या गालात हसत असतात ही अशीच एक 'हसरी' चर्चा गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ रोजी झाली तीचे महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ९ पृष्ठ ६२ वर नोंदविण्यात आलेले प्रतिवृत्त पुढील प्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** युजीसीने स्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यांच्या बरोबर कन्सल्ट करण्याचा प्रश्नच नाही. त्यांनी जे सांगितले नाही ते तुम्ही केले, आता त्यांना कशासाठी कन्सल्ट करता? विथड्रा युवर लोकल प्रॉडक्शन फर्स्ट. माझ्याजवळ त्या अटी आहेत. आमचे हे दुर्दैव की त्या तुमच्या जवळ नाहीत. तर मग ही लक्षवेधी सूचना राखून ठेवा.

**उपसभापती :** युजीसीच्या स्कीममध्ये नाही ते त्यांनी मान्य केले.

**श्री. पी.जी.दस्तुरकर :** म्हणूनच ही लक्षवेधी राखून ठेवा.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, केंद्र शासनाच्या व युजीसीच्या त्या अटींमध्ये या गोष्टी नाहीत म्हणून माझे असे म्हणणे आहे की ही लक्षवेधी सूचना राखून ठेवा.

(गोंधळ)

**श्री. अरुण मेहता :** सभापती महोदय, माझ्या हरकतीच्या मुद्द्यावर उत्तर आले नाही. आपण सांगितले व माननीय सदस्यांनीही म्हटले की आपण अटी वाचून दाखवा. परंतु त्यांच्याजवळ नाहीत माझा हरकतीचा मुद्दा अपहेल्ड झाला. म्हणून त्या आधारावर आपण लक्षवेधी सूचना राखून ठेवली पाहिजे.

**श्री.सुरेश पाटील :** सभापती महोदय, ज्या तीन अटी सांगितल्या आहेत त्या अटींचा आधार घेवून मंत्रिमहोदय वारंवार सांगत आहेत त्या काय आहेत त्या सांगाव्यात अन्यथा ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

**उपसभापती :** त्या अटी त्यांच्याजवळ नाहीत म्हणून ते सांगू शकत नाहीत.

**श्री. अरुण मेहता :** तर मग ही लक्षवेधी सूचना राखून ठेवा.

(गोंधळ)

**श्री. अरूण मेहता :** सभापती महोदय when the minister concerned has incomplete information about the issue तेव्हा लक्षवेधी सूचना राखुन ठेवली पाहीजे दुसरा काय पर्याय आहे.

**उपसभापती :** याला दुसरा काहीच पर्याय नाही."

**१९.** या लक्षवेधी सुचनेच्या चर्चेत शेवटी "सभापती महोदय, ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो." असे उद्‌गार मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी काढले व त्यावर मा. उपसभापती श्री.ना.स.फरांदे यांनी पुढीलप्रमाणे निर्णय दिला :-

**"या सबंध लक्षेवधी सुचनेचा नेमका तोच प्राण आहे. लक्षवेधी सूचनेच्या विषयामध्ये जे आहे तीच माहीती सभागृहासमोर येत नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना मी राखून ठेवतो."**

**२०.** गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ रोजी राखुन ठेवलेली ही लक्षवेधी सूचना शुक्रवार, दिनांक ३ एप्रिल १९९८ च्या कामकाजाच्या क्रमामध्ये पहिल्याच क्रमांकावर दाखविण्यात आली होती. कामकाजाच्या क्रमात लक्षवेधी सुचना येताच मा. मंत्रिमहोदयांनी एक लांबलचक मुद्रित निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले व मा. सभापतींना अशी विनंती केली की, ''**अध्यक्ष महोदय, मी आपल्याला या संबंधीचे पत्र दिलेले आहे. लक्षवेधी सूचनेवर अधिक साकल्याने चर्चा आणि विचार करण्याची गरज शासनाला वाटत आहे. म्हणून आपण या सूचनेसाठी १० दिवसाची मुदत द्यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.**" त्यानंतर ही लक्षवेधी सूचना पुन्हा पुढे ढकलल्या गेली.

**२१.** मा. मंत्रिमहोदयांनी ३ एप्रिल रोजी जे लेखी निवेदन सभागृहात दिले त्यामध्ये असे स्पष्टपणे कबूल करण्यात आले आहे की **"विद्यापीठ अनुदान आयोगाने तदर्थ नियुक्त्या करणे, नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वेतनवाढी रोखून ठेवणे, अपात्र अधिव्याख्यात्यांना जोपर्यंत ते पात्र ठरत नाहीत तोपर्यंतची त्यांनी सेवा वरिष्ठ श्रेणी वा निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरणे याबाबत वेगळे आदेश दिले नाहीत."**

**२२. तदर्थ नेमणूका करण्याच्या घाणेरड्या तरतुदीला मृत्यु कसा आला हे सुद्धा पहाण्यासारखे आहे.** मा. श्री. दिलिप वळसे पाटील यांनी उच्च शिक्षणमंत्री म्हणून कारभार हाती घेतला होता. गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २००० रोजी आमची या विषयावरील लक्षवेधी सूचना सभागृहामध्ये चर्चेसाठी येणार होती. त्यापूर्वी २-३ दिवस अगोदर मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी नागपूर विधानभवनातील त्यांच्या दालनामध्ये प्रा.बी.टी.देशमुख व श्री. वसंतराव काळे यांना चर्चेसाठी बोलाविले. उच्च शिक्षण सचिवापेक्षा खालचे ३-४ अधिकारी यावेळी उपस्थित होते. शिक्षण सचिव लक्षवेधी सूचना असल्याच्या अगोदरच्या दिवशी येणार आहेत, असे सांगण्यात आले. खुद्द उच्च शिक्षण मंत्र्यांच्या हजेरीत व अध्यक्षतेखाली ही अनौपचारिक चर्चा झाली. मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या दालनामध्ये झालेल्या या चर्चेतील काही भाग नमूद करण्यासारखा आहे. २५ जुलै २००० रोजी मुंबई अधिवेशनात एक लक्षवेधी सूचनेवरील निवेदन वितरित झाले होते. काही कारणाने त्यादिवशी त्यावर चर्चा झाली नाही हा भाग वेगळा. शासनाच्या त्या लेखी निवेदनामध्ये शेवटचे वाक्य पुढील प्रमाणे होते :- "वरील तरतुदी लक्षात घेता व दिनांक १९.९.१९९१ च्या अधिसूचनेनुसार शिक्षक पदाकरिता नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण असणे ही आवश्यक अट असल्याने सेवेत असलेले बिगर अर्हताधारक अधिव्याख्याता नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण नसल्याने या शिक्षकांना, त्यांच्या सेवा नियमित करणे, त्यांना वरिष्ठ श्रेणी/निवडश्रेणीचा लाभ देणे याचा लाभ देता येणार नाही." या निवेदनाची प्रत आमच्याजवळ होती. चर्चा सुरु झाली.

**२३.** महाराष्ट्रामध्ये नेटसेटची पात्रता परीक्षा आतापावेतो विधीवतरित्या सक्तीची करण्यात आलेली नसतांना तुम्ही ती सक्तीची कशी काय करू शकता? असा मी प्रश्न काढला तेंव्हा त्यावर एक अधिकारी मंत्रिमहोदयांच्या समक्ष असे म्हणाले की, "विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९.९.१९९१ च्या अधिसूचनेप्रमाणे ही पात्रता परीक्षा सक्तीची करण्यात आलेली आहे." त्यावर मंत्रिमहोदयांच्या समक्षच मी त्या अधिकाऱ्यांना असे सांगितले की, "विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांचे १९.९.१९९१ चे नियम रद्द / निष्प्रभावित केलेले आहेत." त्यांना ते ऐकून धक्काच बसला. ते म्हणाले "कशावरून?" त्यावर मी त्यांना यु.जी.सीच्या ४ एप्रिल २००० च्या पत्रान्वये पाठविलेल्या रेग्युलेशनमधील पुढील पहिलेच वाक्य वाचून दाखविले :-

"In exercise of the powers conferred by clause (e) & (g) of sub-section (1) of Section 26 read with Section 14 of

University Grants Commission Act, 1956 (3 of 1956), and in supersession of the Regulations issued under University Grants Commission letter No.F.1-93/74 (CPP) Part (v) dated 13th June,1983 and No.F.1-11/87 (CPP-II) dated 19th September,1991 and Notification No.1-93/74(CP) dated 19th February, 1985, 26th November, 1985 and No.F.3-1/94 (PS) dated 24th December, 1998, the University Grants Commission hereby makes the following regulations,"

हे वाक्य मी वाचून पुरे करीत नाही तर त्या अधिकाऱ्यांना दरदरून घाम सुटला. "तर मग ही अट आपण रद्द करून टाकू" असे वाक्य त्यांच्या तोंडून बाहेर पडले नाही. तर घामाने डबडबलेल्या त्या अधिकाऱ्याच्या तोंडून "मग आम्हाला आमच्या निवेदनातील ते वाक्य काढून टाकावे लागेल" असे उद्‌गार बाहेर पडले.

**२४.** नागपूर विधानभवनातील मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या दालनात बी.टी.देशमुख व श्री. वसंतराव काळे यांच्या उपस्थितीत शासकीय अधिकाऱ्यांशी ही जी अनौपचारिक चर्चा झाली त्याची शेवटची फेरी लक्षवेधी सूचनेवर सभागृहात चर्चा झाली त्याच्या अगोदरच्या दिवशी पुन्हा झाली. त्या चर्चेला मा. शिक्षण सचिव उपस्थित होत्या. नाही म्हटले तरी मा. उच्च शिक्षण मंत्र्यांसमोर झालेली ती **"सभ्य व सुसंस्कृत बाचाबाची"च** होती.

(१) "पात्रता परीक्षा डिसेंबर १९९९ पर्यंत महाराष्ट्रात सक्तीची करण्यात आली नव्हती." असे आम्ही सांगितले; तर "१९.९.१९९१ ला युजीसीने नोटीफिकेशन काढले होते" असे त्या म्हणाल्या.

(२) "१९.९.१९९१ च्या नोटीफिकेशन मध्येच परिनियम करा असे म्हटले आहे **ते परिनियम महाराष्ट्रात आजपावेतो (डिसेंबर ९९) करण्यात आलेले नाही.** शिवाय युजीसीने आपलेच १९.९.१९९१ चे नोटीफिकेशन स्वतःच रद्द केले आहे." असे आम्ही म्हणालो; तर त्यावर "त्यांनी रद्द केले असेल पण आम्ही २३ ऑक्टोबर १९९२ च्या व २७ नोव्हेंबर १९९२ च्या शासननिर्णयाने ते लागू केले होते ते शासन निर्णय आम्ही रद्द केलेले नाही" असे त्यांनी सांगितले. याबाबतीत शासननिर्णय हे अनौपचारिक माध्यम आहे विधिमय माध्यम नाही.

३) "महाराष्ट्रातील कायद्यानुसार विद्यापीठीय व महाविद्यालयीन **शिक्षकांच्या सेवाशर्ती (भरती पात्रतेच्या अटीसह) शासननिर्णयांनी ठरत नाहीत** तर त्या परिनियमांनी किंवा प्रमाणसंहितेने ठरतात." असे आम्ही सांगितले; तर त्यावर "हे परिनियम केले नाही ही विद्यापीठांची चूक आहे. आम्ही त्यांना कळविले होते" असे त्या म्हणाल्या.

४) "शासनाच्या हुकुमानुसार विद्यापीठांनी परिनियम केले नाही ही विद्यापीठांची चूक आहे किंवा नाही? यावर वाद होवू शकतो पण चूक आहे असे गृहीत धरले तरी **या चुकीची शिक्षा पूर्वलक्षी प्रभावाने या शिक्षकांना कशी काय देता येईल?**" या आमच्या म्हणण्यावर त्या काहीही बोलल्या नाहीत. त्यांच्यातर्फे दुसरे कुणीही काहीच बोलले नाही. उच्च शिक्षणमंत्री मा. श्री. दिलीप वळसे पाटील शांततेने ऐकत होते.

५) "परिनियम तयार न करण्यात विद्यापीठांनी चूक केली असे तुम्ही म्हणता तर मग **"विधीविधानाचा दर्जा नसलेले शासननिर्णय" काढत बसण्यापेक्षा "विधीवत प्रमाणसंहिता" तुम्ही कां निर्गमित केली नाही?** यावर "१९९४ पूर्वी शासनाला तसे अधिकार नव्हते" असे त्या म्हणाल्या. यावर "१९९४ नंतर तरी निदान प्रमाणसंहिता कां निर्गमित नाही केली?" या प्रश्नाला त्यांच्याजवळ उत्तर नव्हते.

६) "१९९४ पूर्वी प्रमाणसंहिता निर्गमित करण्याचे अधिकार शासनाला नव्हते हे तुमचे म्हणणे बरोबर नाही. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तुम्ही १९८४ मध्ये प्रमाणसंहिता निर्गमित केलेली आहे. त्यात पात्रतेच्या अटीसुद्धा आहेत." हे आम्ही सांगितले तर त्यावर "शिक्षकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत पात्रतेच्या अटी ठरविण्यासाठी प्रमाणसंहिता निर्गमित करण्याचे अधिकार १९९४ पूर्वी शासनाला नव्हते." असे त्यांनी पुन्हा सांगितले. त्यावर "१९९४ पूर्वीच्या कायद्यामध्ये सुद्धा असे अधिकार होते." हे आम्ही पुन्हा सांगितले.

७) "परीक्षेचे काम सक्तीचे करणारा कायदा आपण करू शकतो तर राष्ट्रीय पात्रता परीक्षा सक्तीची करणारा कायदा किंवा प्रमाणसंहिता शासन म्हणून आपण करू शकत नव्हतो यावर कोण विश्वास ठेविल?" असे आम्ही विचारले तर त्यावर त्यांच्याकडे उत्तर नव्हते.

८) शासननिर्णयांनी "पात्रता परीक्षा सक्तीची केली होती" असे तुम्ही म्हणता **तर मग हे १०-१२ हजार तरुण प्राध्यापक या व्यवसायात शिरले कसे? महाविद्यालयाच्या फाटकावरून उड्या मारून ते आत आलेत काय?** शासनाचे प्रतिनिधी निवड समितीत होते? नेटसेट नसलेला मनुष्य निवडला जात होता तेंव्हा हे नियमबाह्य कृत्य आहे हे त्यांच्या लक्षात आले नाही काय? त्यांना मान्यता मिळाल्या, वर्षानुवर्षे त्यांना वेतन व्यवस्थेतून वेतन नियमितपणे दिल्या जात आहे हे नियमबाह्य कृत्य जेडीच्या किंवा एओच्या, कोणाच्याच लक्षात आले नाही काय? असे कसे हे भोळे अधिकारी? या प्रश्नांची त्यांच्याकडे उत्तरे नव्हती.

**२५.** आमच्या चर्चेच्या शेवटी स्वतः मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी असे उद्‌गार काढले की, **"विद्यापीठाने किंवा शासनाने सक्तीचा नियम केला नाही त्यात त्या शिक्षकांचा काय दोष आहे? आपली चूक झाली आपण ती दुरुस्त केली पाहिजे. माझी खात्री झाली आहे. आता त्याप्रमाणे निवेदन तयार करा."** अधिकारी मंडळीचे चेहरे कडवट झाले. तेव्हा एकदा तर मंत्री त्यांना म्हणाले "मी सभागृहात उद्या यांना कबूल करून टाकले म्हणजे मग तुम्ही काय कराल? तेव्हा तुम्हीच जरा व्यवस्थित निवेदन करा. सहानुभुतीचा दृष्टिकोन ठेवा." त्यावर मा. उच्च शिक्षण सचिवांनी भात्यातील ठेवणीतला बाण बाहेर काढला "मंत्रिमहोदय! वित्त विभागाशी सल्ला केल्याशिवाय ते आपल्याला करता येणार नाही" त्यावर "काय करता येईल ते पहा" असे उद्‌गार मंत्रिमहोदयांनी काढले. बैठक संपली.

**२६.** शेवटी एकदा ही लक्षवेधी गुरुवार, १४ डिसेंबर २००० रोजी सभागृहात चर्चेला आली. पूर्वपरिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे उच्च शिक्षणमंत्री यांनी त्यांचे जे प्रामाणिक मत होते ते सभागृहात मांडले पण शिक्षण सचिवांनी अनौपचारिक चर्चेत त्याच्यावर (वित्त विभागाचा व मंत्रिमंडळाचा निर्णय पूर्वीच झालेला होता तरीही) लादलेले वित्त विभागाचे ओझे काही त्यांना झटकून टाकता आले नाही. या चर्चेचे अधिकृत प्रतिवेदन पहा :-

"**प्रा.बी.टी.देशमुख** : शिक्षकांचा यामध्ये काय दोष आहे?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : बरोबर आहे.. सन्माननीय सदस्यांचा या प्रश्नांच्या संदर्भामध्ये पूर्ण अभ्यास आहे. त्यांच्याकडे सगळे रेकॉर्ड उपलब्ध आहे. नाही म्हटले तरी मी मंत्री होऊन वर्ष झाले. तसे या क्षेत्राच्या संदर्भातील मी नवीन मंत्री आहे. **म्हणून या संदर्भामध्ये सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केलेली आहे. त्या संदर्भाने तपासावे लागेल. त्यांची प्रमोशन्स थांबविण्याबाबत जे काही निर्णय घेतलेले असतील, यांच्याशीसुध्दा वित्त विभागाचा संबंध असल्यामुळे वित्त विभागाची मान्यता घेऊनच-शेवटी यामध्ये फायनान्शियल बोजा किती वाढणार आहे.... शेवटी यामध्ये वित्तीय बर्डन वाढणार आहे आणि वित्तीय बर्डन वाढते त्या त्या वेळेला वित्त विभागाची संमती घेतल्याशिवाय असा सो मोटो डिसिझन घेता येणार नाही. परंतु ज्या ज्या कर्मचारी आणि शिक्षकांवर अन्याय झालेला आहे त्या शिक्षकांवरील अन्याय दूर करण्याची भूमिका राज्यशासनाची राहील आणि या संदर्भामध्ये विचार विनिमय करुन निश्चित वेळेमध्ये या प्रश्नाच्या सोडवणुकीच्या संदर्भामध्ये मी या ठिकाणी वचनबध्द आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २००० - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १२३, क्रमांक १४ पृष्ठ १४७)*

**२७.** मा. श्री. दिलीप वळसे पाटील यांना या प्रकरणामध्ये पुढे बरीच मेहनत घ्यावी लागली असे दिसून येते. त्यांनी अधिकाऱ्यांच्या याबाबतीत अनेक बैठका घेतल्या. आम्हा लोकप्रतिनिधींशी सुद्धा अनेक चर्चा घडवून आणल्या. यासंदर्भातील त्यांच्या निमंत्रणावरुन एक‌दोन बैठकीसाठी मी त्यांच्या शासकीय निवासस्थानी गेल्याचेही मला आठवते. **नागपूर अधिवेशनात आश्वासन दिल्याप्रमाणे त्यांनी तदर्थ नेमणूकांची तरतुद दफन करण्यात पुढे यश मिळविले** पण त्यामध्ये त्यांना जवळ जवळ ८-१० महिने परिश्रम करावे लागले असे दिसून येते. एका बाजूला सभागृहात त्यांना आम्ही 'त्रास' देत होतो, तर त्याचवेळी नोकरशाहीच्या छळाला तोंड देत त्यांना वाट काढावी लागत होती. त्यावेळची अधिकृत प्रतिवेदने इतक्या वर्षांनी आज जेंव्हा मी पुन्हा वाचतो तेंव्हा यापेक्षा वेगळी भावना मनामध्ये येत नाही हे नमूद केले पाहिजे. ही प्रतिवेदने पुढील प्रमाणे :-

"**श्री.बी.टी.देशमुख:** कॅबिनेटने निर्णय घेतला आहे.

**श्री.दिलीप वळसे पाटील** : आपण म्हणता ते १०० टक्के खरे आहे असा मी विश्वास ठेवतो. या सदनामधील ती परंपरा आहे. तरीसुध्दा या खात्याचा मंत्री म्हणून काम करतांना मी जरी मंत्री असलो तरी या राज्यातील प्रशासन आपल्याला माहिती आहे आणि मलाही माहिती आहे. मघाशी सन्माननीय सदस्य जाता जाता एक शेरा मारुन गेले. मंत्री निर्णय घेतात की सचिव घेतात. तरी सुध्दा **मी आपल्याला असे सांगतो की तीन महिन्यामध्ये या प्रश्नाच्या बाबतीत आपण अंतिम निर्णय घेणार आहोत.** अशा परिस्थितीमध्ये प्लेसमेन्टच्या बाबतीत अगोदर निर्णय घेण्यात आल्यामुळे काय फरक पडेल हे आपण मला सांगितले तर बरे होईल. या संदर्भात पूर्णपणे त्यांना प्रोटेक्शन देण्याची व्यवस्था करु."

"**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशनकडून जे उत्तर आलेले आहे त्याची प्रत माझ्याकडे आहे. ते गेली दहा वर्षे हेच लिहीत आहेत की, आम्ही असे केलेले आहे आणि ते तुम्ही म्हणजे राज्य शासनाने कम्पलसरी करावे. नेटसेटची परीक्षा रिक्रुटमेंट लेव्हलला सक्तीची झाली पाहिजे याबद्दल दुमत नाही. हे उद्या करु नका तर आज करा असे मी अनेक वर्षे अनेक वेळा बोललो आहे. बोलतो आहे. मागच्या वेळेला **"तीन महिन्यामध्ये निर्णय घेऊ" असे आपण सांगितले होते. त्याला आता चार महिने झालेले आहेत.** माननीय मंत्री महोदयांनी दि.१४ डिसेंबर २००० रोजी सभागृहामध्ये स्पष्ट आश्वासन दिले होते की, "**या सर्व प्राध्यापकांना नेटसेटच्या अटीमधून वगळण्यासंबंधी मी अतिशय सुस्पष्ट अशी भूमिका या सभागृहामध्ये मांडलेली आहे. काही बाबींच्या संदर्भामध्ये वित्त विभाग आणि बाकीच्या विभागांचा खुलासा घ्यावा लागेल. तो घेतल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीमध्ये या प्रश्नाची सोडवणूक करण्याचे अभिवचन मी याठिकाणी दिलेले आहे.**" तसेच पुढे असेही म्हटलेले आहे की, "परंतु ज्या ज्या कर्मचारी आणि शिक्षकांवर अन्याय झालेला आहे त्या शिक्षकांवरील अन्याय दूर करण्याची भूमिका राज्य शासनाची राहील आणि या संदर्भामध्ये विचार विनिमय करुन निश्चित वेळेमध्ये या प्रश्नाच्या सोडवणुकीच्या संदर्भामध्ये मी या ठिकाणी वचनबध्द आहे."

**सभापती** : त्यावेळेला तीन महिन्याचा कालावधी दिलेला आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : होय, सभापती महोदय, आता माननीय मंत्री महोदय दोन महिन्याचा कालावधी लागेल असे सांगत आहेत. त्यालाही माझी ना नाही. माझे ठाम म्हणणे असे आहे की, यु.जी.सी. ने व केंद्र शासनाने या अटी घातलेल्या नाहीत. तसे म्हणाल तर मग आणखी काही प्रश्न विचारुन मला राज्य शासनाची चूकीची भूमिका रेकॉर्डवर घ्यावी लागेल. या सर्व अटी यु.जी.सी. ने व केंद्र शासनाने घातलेल्या नाहीत, जर घातल्या असतील तर त्याला माझी ना नाही. **पण तदर्थ स्वरुपाच्या नेमणूका देणे, वार्षिक वेतनवाढ देण्यात न येणे, त्यांची सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विचारात न घेणे, सेवा ज्येष्ठता न देणे इ. अटी यु.जी.सी. ने व केंद्र शासनाने** घातलेल्या असतील तर माझी तक्रार नाही पण जर यु.जी.सी.ने व केंद्र शासनाने या अटी घातल्या नसतील तर त्या रद्द करु असे स्पष्टपणे सांगा. नाही तर मग मला यावर आणखी प्रश्न विचारावे लागतील. माननीय मुख्यमंत्र्यांच्या लेव्हलवर अॅग्रीमेंट झालेले आहे. मुख्य सचिव, वित्त सचिव, हजर होते आणि त्या कार्यवृत्तावर उच्च शिक्षणसचिवांची सही आहे. **तेव्हा या वरील अटी रद्द करणार आहात काय ते सांगा.**

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : सभापती महोदय, होय.

**डॉ.अशोक मोडक** : सभापती महोदय, आता हा प्रश्न मिटलेला आहे पण मला वेगळ्या प्रकारची विनंती करावयाची आहे. गेली चार-पाच वर्षे हा वारंवार प्रश्न येथे चर्चेसाठी येत आहे. आमच्या सर्वांचे इम्प्रेशन असे झाले आहे की, नकार निःसंदिग्ध आणि होकार संदिग्ध स्वरुपाचा असतो आणि हे क्लेशकारक आहे. एखादी गोष्ट करावयाची नाही, प्राध्यापकांना पगार द्यावयाचा नाही हे ठामपणे, निःसंदिग्धपणे सांगितले जाते आणि ज्याठिकाणी ठामपणे होकार सांगावयाचा असतो तेव्हा संदिग्ध स्वरुपामध्ये सांगता. अशा वेळेला एक चांगल्या प्रकारचा पायंडा पाडण्याच्या दृष्टीने माझी विनंती अशी आहे की, अशा प्रकारे कृपा करुन गुळगुळीत उत्तर देऊ नका. माननीय मंत्री महोदय दोन महिन्यामध्ये कार्यवाही करणार आहेत याबद्दल मला पूर्ण विश्वास आहे. माझी विनंती आहे की, याबाबतीत आपण पूर्ण श्रेय घ्यावे, अंशतः श्रेय का घेत आहात?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : सभापती महोदय, विनंतीचा स्विकार केला आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २००० - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १२३, क्रमांक १४ पृष्ठ १५०)*

**२८.** "**श्री. दिलीप वळसे पाटील** : सभापती महोदय, **ही बाब खरी आहे की, १९९१ साली यु.जी.सी.ने रेग्युलेशन्स राज्य सरकारला पाठविले होते. त्यानंतर राज्यसरकारने हे रेग्युलेशन्स विद्यापीठांना पाठवत असतांना ते असाधारण राजपत्रात प्रसिध्द करुन पाठवावयास पाहिजे होते. तसे करण्यात आले असते तर ते लीगल इन्स्ट्रुमेन्ट ठरले असते. परंतु राज्य सरकारकडून त्या वेळी ही चूक झालेली आहे.** १९९१ मध्ये जी.आर.काढून राज्य सरकारने विद्यापीठांना हे आदेश पाठविले होते. राज्य सरकारचा हा जी.आर.जरी असला तरी लीगल इन्स्ट्रुमेन्ट नसल्यामुळे विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नसतील. त्यामुळे कदाचित मधल्या काळात या नियुक्त्या होत राहिल्या आहेत. ज्यावेळी पाचवा वेतन आयोग लागू करण्याची वेळ आली त्यावेळी दिनांक ११-१२-१९९९ रोजी मी शिक्षण मंत्री होतो त्यावेळी या संदर्भात विहित पध्दतीने विद्यापीठांना आदेश देण्यात आले होते एवढेच नव्हे तर विद्यापीठ कायद्यात सुध्दा त्या संदर्भात आपण काही दुरुस्ती केली होती. त्याचा परिणाम असा झाला की १९९१ साली राज्य सरकारने आदेश देऊनही विद्यापीठाने आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नव्हते. आता १९९९ मध्ये राज्य सरकारने आदेश दिल्यानंतर सर्व विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले आहेत. यु.जी.सी. असे म्हणते की नेट-सेट १९९१ पासून अनिवार्य आहे. सुप्रीम कोर्टाचे जजमेंट वेगळे म्हणते. राज्य सरकारने वारंवार यु.जी.सी.च्या आधाराने आणि बाकीच्या गोष्टींच्या आधाराने सभागृहामध्ये तसेच सभागृहाच्या बाहेरही परीक्षा अनिवार्य आहे अशी भूमिका घेतली आहे त्यामुळे या राज्यामध्ये १९९१ सालापासून ते १९९९ सालापर्यंतच्या मधल्या काळात जे शिक्षक निरनिराळ्या विद्यापीठात नोकरीस लागलेले आहेत ज्यांनी नेट-सेटची अर्हता धारण केलेली नाही **अशा १० हजार शिक्षकांच्या भवितव्याचा हा प्रश्न आहे आणि या राज्यातील या दहा हजार शिक्षकांच्या भवितव्याचा प्रश्न सहानुभूतीने सोडविण्याच्या दृष्टीने राज्य सरकार निश्चितपणे विचार करीत आहे मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की या संदर्भातील निर्णय राज्य सरकार १५ दिवसामध्ये घेईल.** " *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५ पृष्ठ १४१)*

**२९.** महाराष्ट्रभर शिक्षकांचा तीव्र असंतोष, सभागृहात सतत होणाऱ्या चर्चा, "मंत्रिमडळाने व वित्त विभागाने अगोदरच ज्या गोष्टींना मान्यता दिली आहे त्यामध्ये मंत्रिमंडळाची व वित्त विभागाची मान्यता न घेता 'काड्या' करणारी परिपत्रके काढायची व ती परिपत्रके रद्द करण्याची वेळ आली की पुन्हा मंत्रिमंडळाच्या व वित्त विभागाच्या मान्यतेचा बागुलबोवा उभा करुन छळवाद मांडण्याच्या" आयुधांचा नोकरशाहीने केलेला वापर, यावर मात करुन **मा. श्री. दिलीप वळसे पाटील यांनी तदर्थ नेमणूकीच्या तरतुदीचे दफन करणारा शासन निर्णय दिनांक १८ ऑक्टोबर २००१ रोजी निर्गमित केला.** दिनांक १८ ऑक्टोबर २००१ रोजी निर्गमित केलेल्या या शासन निर्णयाचा पहिलाच परिच्छेद पुढील प्रमाणे :-

**"१. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक एन१ जीसी १७९४/७९४५/विशि-४, दिनांक २२.१२.१९९५ रोजी जे आदेश काढले आहेत ते रद्द करण्यांत येत आहे."**

याच शासननिर्णयात त्यांच्या सेवेत खंड पडणार नाही त्या अखंडीत राहतील. सेवानिवृत्ती होईपर्यंत ते सेवेत राहतील अशीही तरतुद आहे. तदर्थ नेमणूकीच्या तरतुदीचे दफन झाले हे खरे असले तरी "त्यांना नेटसेट केल्याशिवाय वरिष्ठ किंवा निवडश्रेणी मिळणार नाही" अशी तरतुद या शासननिर्णयात घुसाडण्यामध्ये नोकरशाही यशस्वी झाल्यामुळे **नेटसेट या पात्रता अटीने अर्धनारी नटेश्वराचे रुप धारण केले** व त्यातुनच पुढे ५-६ वर्षे मोठ्या प्रमाणात कोर्ट कचेऱ्यांचा एक टप्पा सुरु झाला. त्याची सुद्धा माहिती मी नमूद करु इच्छितो.

**३०.** मुळात नेटसेटची पात्रता परीक्षा लागू करणारे रेग्युलेशन विद्यापीठ अनुदान आयोगाने १९९१ मध्ये निर्गमित केले त्याच्या स्वरुपाबाबत देशभरात अनेक ठिकाणी विशेषतः खुद्द दिल्ली विद्यापीठातच याबाबत वाद निर्माण झाला. दिल्ली विद्यापीठाला हायकोर्टाच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात जावे लागले. Civil Appeal No. 1819 of 1994, decided on 8-9-1994, in University of Delhi, Appellant v/s Raj Singh and others, Respondents. A.M. AHMADI AND S.P. BHARUCHA, JJ. : AIR 1995 SUPREME COURT 336 या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने पुढील प्रमाणे निर्णय दिला. :-

"**i) Regulations are valid :** Regulations (1991), notified on 19th September, 1991, by the University Grants Commission are valid.

**ii) recommendatory :** The provisions of clause 2 of

the said Regulations are, therefore, recommendatory in character.

**iii) application prospective :** The second proviso to clause 2 makes the application of the said Regulations prospective."

**३१.** सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेटसेट बाबतच्या १९९१ च्या रेग्युलेशनचे तपशीलवार विश्लेषण करणारा हा जो उपरोक्त निवाडा दिनांक ८.९.१९९४ रोजी दिला त्यानुसार हे रेग्युलेशन शिफारसींच्या स्वरुपाचे (The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character.) आहे. ते सक्तीचे करावयाचे किंवा नाही याबाबतचा निर्णय विद्यापीठाने वा शासनाने घ्यावयाचा आहे. तसा निर्णय घेण्यात आल्यास तो परिनियम किंवा प्रमाणसंहिता निर्गमित केल्यानंतरच्या काळात (The second proviso to clause 2 makes the application of the said Regulations prospective.) लागू पडेल, पूर्वलक्षी प्रभावाने नव्हे. हे रेग्युलेशन उमेदवारासाठी (Relates to all applicants i.e. candidates) लागू आहेत, असे त्या निर्णयामध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे.

**३२.** मा. सर्वोच्च न्यायालयाने याच प्रकरणात दिलेल्या निर्णयातील २४ वा परिच्छेद पुढील प्रमाणे आहे.:-

" **24.** It is now appropriate to clarify the direction that the Delhi High Court issued in allowing the writ petition. It held that the notification dated 19th September, 1991, by which the said Regulations were published, was valid and mandatory and the Delhi University was obliged under law to comply therewith. The Delhi University was directed to select lecturers for itself and its affiliated and subordinate colleges strictly in accordance with the notification. Put shortly, the Delhi University is mandated to comply with the said Regulations. As analysed above, therefore, the **Delhi University may appoint as a lecturer in itself and its affiliated colleges one who has cleared the test prescribed by the said Regulations;** or it may seek prior approval for the relaxation of this requirement in a a specific case; or **it may appoint as lecturer one who does not meet this requirement without having first obtained the UGC's approval,** in which event it would, if it failed to show cause for its failure to abide by the said Regulations to the satisfaction of the U.G.C. forfeit its grant from the U.G.C. If, however, it did show cause to the satisfaction of the U.G.C., it not only would not forfeit its grant but the appointment made without obtaining the U.G.C.'s prior approval would stand regularised."

**३३.** सर्वोच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाबाबत महाराष्ट्र शासनाची भूमिका जाणून घेण्यासाठी आम्ही विचारलेला तारांकित प्रश्न क्रमांक १९५२१ हा ११ डिसेंबर २००१ च्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट होता. "**नेटसेटची परीक्षा उमेदवारांसाठी सक्तीची करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या रेग्युलेशनबाबत एका प्रकरणात (सिव्हील अपील नं.१८१९/१९९४ ए.आय.आर. सुप्रिम कोर्ट ३३६) सर्वोच्च न्यायालयाने या रेग्युलेशनची तपशीलवार चिकित्सा करणारा अंतिम निर्णय दिला व विद्यापीठ अनुदान आयोगाचे हे रेग्युलेशन शिफारशीच्या (रेक्मेंडटरी) स्वरुपाचे असून त्या शिफारसी राज्य शासनाने किंवा विद्यापीठाने सक्तीच्या केल्यास पुढील काळात सेवेत येणाऱ्या अर्जदारांना लागू राहतील (प्रॉस्पेक्टीव्ह) असा स्पष्ट निवाडा सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेला आहे, हे खरे आहे काय;**" या आमच्या प्रश्न भाग १ ला मा. उच्च शिक्षणमंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यानी एका शब्दात "होय" असे ठाम उत्तर दिले होते. *(तिसरे अधिवेशन २००१: मंगळवार, दिनांक ११ डिसेंबर २००१: महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, खंड १२६, क्रमांक ७, पृष्ठ ३९)*

**३४.** सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय आल्यानंतर देशभर त्यामुळे व्यापक हालचाली झाल्या. खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाला त्यांची अनेक पावले मागे घ्यावी लागली. त्याची माहिती करुन देणे मला आवश्यक वाटते. खरे म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोगाने मुळात "**नेटसेट असल्याशिवाय वरिष्ठ किंवा निवडश्रेणी दिली जाणार नाही**" अशी भूमिका घेतली होती. २४ डिसेंबर १९९८ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेच्या परिच्छेद ८.४. मध्ये ही भूमिका नमूद आहे. "सेवेत भरती झाल्यावर, प्लेसमेंटच्या वेळी अशी अट लादल्यामुळे नेटसेटची अट पूर्वलक्षी प्रभावाने लादण्याचे, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अधिक्षेप करणारे पाप तुमच्या हातून घडेल." ही गोष्ट संघटनांनी लक्षात आणून दिल्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाने आपली भूमिका बदलली व नेटसेट बाबतच्या आपल्या पूर्वीच्या सर्व अधिसूचना रद्द केल्या व ४ एप्रिल २००० चे रेग्युलेशन समाविष्ट असलेली अधिसूचना निर्गमित केली. ही अट विद्यापीठ अनुदान आयोगाने काढून टाकली पण आमच्या नोकरशाहीला मात्र त्यापासून काही बोध घेता आला नाही.

**३५.** नेटसेटबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने आपली भूमिका ४ एप्रिल २००० च्या रेग्युलेशनव्दारे स्पष्ट केलेली आहे. "कोणत्याही व्यक्तीला (No person) नेटसेटची पात्रता परीक्षा उत्तीर्ण केल्याशिवाय विद्यापीठातून व महाविद्यालयातून शिक्षकीय पदावर नेमता येणार नाही" असे स्पष्टपणे नमूद करित असतांनाच विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या या नियमाला एक परंतुक जोडलेले आहे. यापूर्वीच नेमल्या गेलेल्या व्यक्तींच्या बाबतीत या परंतुकामध्ये असे ठामपणे नमूद करण्यात आलेले आहे की :- " Provided further that these regulations shall not be applicable to such cases where selections of the candidates having had the then requisite minimum qualification as were existing at that time through duly constituted Selection Committees for making appointments to the teaching posts have been made prior to the enforcement of these regulations." यथोचितरित्या अस्तित्वात आलेल्या निवडसमितीच्या मार्फत ज्यांची निवड झालेली आहे व **त्यावेळी अस्तित्वात असलेली किमान पात्रता जे धारण करतात त्यांना नेटसेटच्या पात्रतेचा नियम लागू असणार नाही,** अशी विद्यापीठ अनुदान आयोगाची स्पष्ट भूमिका आहे. १९९९ पर्यंत महाराष्ट्रामध्ये अधिव्याख्यात्याच्या भरतीसाठी कायद्याने ठरवून दिलेली किमान पात्रता काय होती?

**३६.** या साऱ्या पार्श्वभूमीवर १८ ऑक्टोबर २००१ चा सेवा सातत्य देणारा शासननिर्णय निघाला त्याचा परिच्छेद १ (इ) पुढील प्रमाणे :-

"इ) दिनांक ११.१२.१९९९ नंतर सेवेत आलेले बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांना या सवलती देय असणार नाहीत. तसेच, त्यांच्या सेवा परिविक्षा कालावधी पूर्ण होण्याच्या आत संपुष्टात आणाव्यात."

या तरतुदीमुळे व्यथित झालेल्या या अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने ही सर्व प्रकरणे 'एक्झ्मशन' देण्याच्या निर्णयार्थ विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठवावी असा निर्णय दिला.अशाच अनेक प्रकरणी मा. मुंबई खंडपीठाने सुद्धा असाच निर्णय दिला, मात्र निर्णय घेण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाला ४ महिन्याची मुदत दिली.

**३७.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पातळीवर खुपच विलंब झाल्यामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने जो पत्रव्यवहार केला त्याच्या प्रति त्यांनी माझ्याकडे पाठविल्या त्यांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता विद्यापीठ अनुदान आयोगाने त्याबाबतीत विधि सल्लागाराचा सल्ला घेतल्याचे दिसून येते. ३ ऑगस्ट २००५ रोजी त्या महासंघाला विद्यापीठ अनुदान आयोगाने पाठविलेल्या पत्रातील महत्वाचा भाग पुढील प्रमाणे :-

"However, the matter was referred to our legal Consultant also, who has also suggested that the UGC should consider the cases for selection of various candidates on merit within the parameters of relaxation as contemplated under the UGC regulations of 1991

and 2000 if applications are forwarded by the College/Institution through the University as directed by the Bombay High Court."

**३८.** आता उच्च न्यायालयाने काय म्हटले होते ते पाहू. **विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विधीसल्लागारांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला धरून कारवाई करावी असा सल्ला विद्यापीठ अनुदान आयोगाला दिला आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने २००१ च्या याचिका क्रमांक ५०२२ मध्ये दिनांक २० फेब्रुवारी २००२ रोजी दिलेल्या निकालात स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की** :- " We also hold that the cases of candidates appointed from 12th October, 1999 till 18th October, 2000 are required to be examined so as to ascertain the applicability of the first proviso to clause 2 of the 1991 Regulations as well as 2000 Regulations before their services are sought to be terminated by the respective universities and/ or colleges/ institutions." याचा अर्थ "१२ ऑक्टोबर १९९९ ते १८ ऑक्टोबर २००० या काळातील प्रकरणांची छाननी करावी" असा हा निर्णय आहे.

**३९.** मा. मुंबई उच्च न्यायालयाने २००१ च्या याचिका क्रमांक ५७८२मध्ये दिनांक १४ एप्रिल २००२ रोजी दिलेल्या निर्णयाच्या निकालात स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की :- " 7. In the event the UGC takes decision adverse to the interests of teachers the management and the University are directed not to act upon it for a **period of four weeks from the date of communication** by UGC to the college through the University. **In the result the petitions mentioned in the schedule to this order are disposed of by this order.....** Except those petitions mentioned to be heard separately, rest of the petitions mentioned in the **SCHEDULE** are covered by this order and are accordingly disposed." या निर्णयात शेवटी **परिशिष्ट** देण्यात आले असून त्या परिशिष्टात दिलेल्या १०४ प्रकरणांची छाननी करुन विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्णय घ्यावा असे नमूद असतांना त्या निकालाचे निमित्त करुन हजारो प्रकरणांना बॅगा भरभरून महाराष्ट्रातून दिल्लीला कां पाठविण्यात आले हे समजण्या पलिकडचे आहे.

**४०.** "असल्यास, नेटसेटची परीक्षा सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी सक्तीची करणे, त्यांना बढतीच्या संधी नाकारणे, या विसंगती दूर करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचा उक्त निर्णय लक्षात घेता व युजीसीचे ४ एप्रिल २००० चे रेग्युलेशन विचारात घेता शासनाने काय उपाययोजना केलेली आहे; अद्याप उपाययोजना केलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?" या प्रश्न भाग २ व ३ ला त्यांनी एकत्रीतरित्या "विद्यापीठ अनुदान आयोगाकडून दिनांक ४ एप्रिल २००० रोजी निर्गमित केलेले विनियम विचारात घेता शासनाने **दिनांक १९-९-१९९१ ते ११-१२-१९९९ या कालावधीत विहित निवड समितीच्या माध्यमातून नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा काही अटीवर खंडीत न करण्याबाबतचा निर्णय दिनांक १८-१०-२००१ च्या आदेशान्वये निर्गमित केला आहे.**" असे उत्तर दिले होते.

**४१.** मा. औरंगाबाद खंडपिठाने स्पष्टपणे १२ ऑक्टोबर १९९९ ते १८ ऑक्टोबर २००० या फक्त १२ महिन्याच्या काळातील प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्यास सांगितली होती. मा. मुंबई खंडपिठाने १०४ प्रकरणे पाठवावी असा निर्णय देऊन ती सारी प्रकरणे आपल्या निकालाच्या परिशिष्टात समाविष्ट केली होती. असे असतांना हजारो प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडे कशी काय पाठविण्यात आलीत? हा संशोधनाचाच विषय आहे, नेट-सेट १९९९ पूर्वी कायद्याने आमच्या कडे लागू केले नव्हते हे कोणत्याच अधिकाऱ्याला ठावूक नव्हते काय? नागपूर विद्यापीठाच्या कुलसचिवांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला पाठविलेल्या दिनांक १७.डिसेंबर २००२ च्या पत्राच्या परिच्छेद ६ मध्ये या साऱ्या बाबी नमूद केल्या होत्या. हा परिच्छेद ६ पुढील प्रमाणे

"(6) The approach of the State Govt. is very clear from the following submission.-

(a) Depending upon the UGC notification No. F-1/11/87/CPP, dated 19th September, 1991 the State Govt. has issued a GR dated 23rd October, 1992 which was immediately withdrawn by the new GR dated 27th November, 1992.

(b) Meanwhile UGC was continuously writing to State Govt. for setting up an accredited NET at State level and to make suitable amendment in the University Statute.

(c) The constantly changing mind of the State Govt. will be clear from the fact that, the State Govt. has issued three circulars within the span of three months. First circular was issued on 2.2. 1994 directing the University to continue the services of the teachers, who have not passed the NET for further period till 31st March 1994. Second circular was issued on 7.3.1994 for extending the limit of passing NET till 31.3.1995. Third circular was issued on 28.4.1994 specifying therein that the tenure of services of the teachers in the Colleges and Universities has been further extended upto 31.3.1996 for passing NET.

(d) Thereafter Higher and Technical Education and Employment Department of the State of Maharashtra again issued Government Resolution No. NGC/1794/7945/UE-4, dated 22.12.1995 for withdrawing the limit of passing NET/SET examination which was earlier prescribed till 31.3.1996 and it was clearly mentioned that the appointment of such lecturers should be considered on ad-hoc basis. Even though such appointments should be considered on ad-hoc basis, such lecturers shall not be removed from the services on the ground that they have not passed NET/SET examination, however, yearly increments shall not be granted to such lecturers till they pass NET/SET examination.

(e) Then the State Government again issued GR dated 22.5.1998 by resolving to relax the condition of withholding the yearly increments with effect from 1.4.1998. It further prescribes that the yearly increments of the lecturers after 1.4.1998 should not be withheld on the ground that such lecturers have not passed NET/SET examination.''

**४२.** नागपूर विद्यापीठांच्या कुलसचिवांनी पाठविलेल्या या पत्रातील परीच्छेद ६ (एफ) पुढील प्रमाणे आहे:-

"(f) Instead of firmly introducing NET/SET as a compulsory qualification at recruitment level by the competent legal instrument such as Standard Code, the State Govt. was constantly introducing NET/SET qualification by informal instruments and was simultaneously enjoying the benefits of not introducing it. Since NET/SET was not inducted as a compulsory qualification at the recruitment level by legal instrument , hundreds of candidates without NET/SET, were recruited from 1991 till the cut-off date i.e. 28.12.1999 in this university area. Advertisements were approved, Selections were made approvals were granted by the university and; because it was the perfectly lawful recruitment in the teaching cadre, 100% salary grants were paid by the State Govt. in respect of such lawfully recruited teachers year after years and continue to be so paid even to-day. A small No. of teachers shown in Appendix A, from out of the lawfully recruited so many teachers are carved out

for discriminatory treatment by Govt. resolution No. NGC/1181/(38)/01/UE-4, dated 18.10.2001."

हा पूर्ण परिच्छेद मी संदर्भाधिन चर्चेच्या वेळी सभागृहात वाचून दाखविला त्यामुळे आमच्या नोकरशाहीला ही वस्तुस्थिती माहिती नाही असे म्हणण्याची सोय राहीलेली आहे असे मला वाटत नाही.

**४३.** हजारो शिक्षकांशी नोकरशाहीने केलेल्या छल कपटाच्या या प्रदिर्घ प्रवासामध्ये आज आता आपण कोठे आहोत.

(१) काही शेकड्यांनी प्रकरणे पाठविण्याचे मा. उच्च न्यायालयाचे आदेश होते आपण हजारोनी प्रकरणे पाठविली.

(२) चार महिन्यात विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्णय द्यायचा होता तो ६-७ वर्षांनी त्यांनी दिला.

(३) विद्यापीठ अनुदान आयोगाने काय निर्णय दिलेला आहे ते आपण आपल्या संदर्भिय निवेदनातच पुढील शब्दात सभागृहात सांगितले :-

"विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ५ नोव्हेंबर, २००८ च्या पत्रात नमूद केलेल्या खालील अटीनुसार एकूण ८३७ शिक्षकांना नेट/सेट पात्रतेपासुन सुट देण्यात येत असल्याचे विद्यापीठांस कळविले आहे.

1) That the recommended exempted candidate should have been selected by a duly constituted Selection Committee.

2) The constitutional provision of reservation for SC/ST etc. are followed in these selections."

**४४.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्थायी समितीने दिनांक ३ व ४ सप्टेंबर २००८ च्या सभेमध्ये नेटसेटग्रस्त शिक्षकांच्या बाबतीत काही धोरणात्मक शिफारसी केलेल्या आहेत. त्यात "**With regard to the candidates who had not cleared the NET/ SLET at the time of selection or appointment** and were otherwise found qualified and appointed against existing vacancies on the recommendation of the Selection Committee but were not appointed on a regular basis for lack of NET/SLET clearance and due to non approval from the concerned authorities, the **Committee was of the opinion that if the said appointees have been in continuous service for a period of five years, they will be recommended for exemption from NET/SLET. The Committee further finds that such appointments at the initial stage were only irregular, in the sense, that it is not illegal though the other requirements for regular appointment such as qualifications, selection procedure and existence of vacant posts etc. were duly met and therefore could be regularized.** The committee feels that their appointment was necessitated due to non availability of NET/SLET qualified candidates and their five years service is considered to be sufficient for regularizing their services." अशी एक महत्वपूर्ण शिफारस आहे.

**४५.** या शिफारशींवर ७ व ८ ऑक्टोबर २००८ रोजीच्या बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाने काही धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. ज्यात एक निर्णय पुढील प्रमाणे आहे :- "With reference to your proposal on the above subject, I am directed to inform you that the matter was placed before the Commission at its meeting held on 7th & 8th October, 2008. **The Commission was of the view that since no NET qualified/NET exempted candidate was available at the time of interview and had continued service of 5 or more years the NET /SLET qualification is relaxed in respect of the following candidates for appointment as Lecturer with the following conditions :-**

(i) That the recommended exempted candidate should have been selected by a duly constituted Selection Committee.

(ii) The constitutional provisions of reservation for SC/ST etc. are followed in these selections."

**४६.** त्यानंतर उपरोक्त निर्णय अशा ६३७ शिक्षकांच्या बाबतीत नागपूर विद्यापीठाच्या कुलसचिवांना (त्याचप्रमाणे तत्सम शिक्षकांच्या बाबतीत इतर विद्यापीठांच्या कुलसचिवांना) दिनांक ५ नोव्हेंबर २००८ च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने कळविला आहे;

**४७.** Writ Petition Nos. 4266/2006, 5037/08,4486/ 2007, 4386/07, 4500/07 and 462/2008 या प्रकरणात दिनांक २७ नोव्हेंबर, २००८ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने

"**So far as the lecturers, who were in service, from 1991 onwards, the issue of exemption to them is claimed to be covered by the orders passed by the UGC on 5.11.2008 based on the Commission's decision in its meeting dated 7th and 8th October 2008.** If any of the petitioners are governed by this communication dated 5.11.2008 addressed by the UGC to the Registrar of the University concerned, **undoubtedly, their proposals will have to be considered and approved, as per the said decision of UGC** and also the decision of the Government of India, if any, subsequently taken and applicable to the teacher appointed between the years 1991 to 2006." असा निर्णय दिलेला आह.:

**४८.** विभागाचे प्रमुख या नात्याने ही बाब समजून घेतल्यानंतर या विभागाचे मंत्री या नात्याने सभागृहात शासनाच्या वतीने आपण पुढील प्रमाणे निर्णय घोषित केले.:-

"**सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यानी जे तीन प्रश्न विचारलेले आहे त्या बाबत मी शासनाच्या वतीने सांगू इच्छितो की, या सदंर्भात एक जी.आर. काढणे आवश्यक आहे** तेव्हा या अधिवेशनाचा कालावधी संपण्याच्या अगोदर हा जी. आर. काढण्यात येईल जर २४ तारखेला अधिवेशन संपणार असेल तर त्या अगोदर जी. आर. काढण्यात येईल. **आपला अधिवेशनाचा कालावधी त्या दरम्यानचा राहील असे वाटते तेव्हा हे अधिवेशन संपण्याच्या अगोदरचा हा जी आर काढण्यात येईल. त्याचबरोबर अधिव्याख्यात्यांना नियमित करण्याचे विद्यापीठाचे काम सुरु आहे. विद्यापीठाला सुध्दा सभागृहाच्या भावना कळविण्यात येतील तसेच** हे काम एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे अशी सूचना विद्यापीठाला देण्यात येईल." पुढे आपण असेही सांगितले की, "हे करिअर ॲडव्हान्समेंट स्कीमच्या संदर्भात हे कॅसचे काम पूर्ण करावयाचे आहे त्यासाठीदेखील कॅम्प्स घेऊन येत्या दोन महिन्यात पूर्ण करावयाचे आहे. अशा प्रकारे हे एकूण सर्वच काम म्हणजे नियमित करण्याचे काम एक महिन्यात आणि त्यापुढे कॅसचे काम दोन महिन्यात असे तीन महिन्यात पूर्ण करून या सगळ्या प्रश्नांना पूर्णविराम दिला जाईल."

**४९.** याबाबतचा शासननिर्णय निर्गमित झाला नाही, त्याचा अर्थ मंत्रिमंडळाच्या मान्यतेचा व वित्त विभागाचा बागुलबोवा पुन्हा उभा करण्यात आला असावा असे वाटते. मा. मुख्यमंत्री, मुख्य सचिव, उच्च शिक्षणमंत्री, वित्तसचिव, उच्च शिक्षण सचिव यांनी सतत पाच दिवस, पाच पाच तास बसून काही ठाम निर्णय घेतले त्या बैठकीमध्ये ठामपणे घेण्यात आलेला एक महत्वाचा निर्णय पुढील प्रमाणे :- "The Government of

India's suggestions on revision of pay scales for teachers in Universities and Colleges dated 17th June, 1987 as amended by subsequent agreement dated 4th and 5th Sept., 1987 and Govt. of India's suggestions dated 22nd July, 1988, would be implemented by the State Government with the recommended scales of pay, including the element of promotion involved therein as a composite scheme w.e.f. 1.1.1986 " हे सर्व ठरले त्याला मंत्रिमंडळाची व वित्त विभागाची मान्यता होती. एकदा केंद्राच्या सूचनेप्रमाणे करण्याचे उच्चतम राजकीय नेतृत्त्वाच्या पातळीवर ठरल्यानंतर व त्याला वित्तविभागाची मान्यता मिळाल्यानंतर केंद्राच्या सूचनांमध्ये नसलेल्या ज्या "काड्या" मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी करून ठेवल्या त्या "काड्या" परत मोडून काढण्यासाठी, उच्च शिक्षण मंत्र्यांनी पुन्हा मंत्रिमंडळाकडे व वित्त विभागाकडे जावे व नोकरशाहीने दात काढत बसावे हे सारेच 'प्रेक्षणिय' म्हणावे लागेल.

**५०.** काटेकोरपणे व नियमाप्रमाणे काम करण्यात क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे व त्यांना संरक्षण देण्याऱ्या नोकरशाहीचे लाभालाभ पत्रक बिघडून जाते. त्यातील काहींना एखादी गोष्ट सक्तीची करून टाकली की मागेपुढे करायला जागा रहात नाही. त्यामुळे आम्ही म्हटले तर नेटसेट सक्तीची आहे, म्हटले तर ती सक्तीची नाही, असा प्रेमाचा मामला वर्षानुवर्षे चालू ठेवण्यात क्षेत्रीय अधिकाऱ्यांना स्वर्गसुखाचा आनंद होतो. जाईन्ट डायरेक्टरच्या कार्यालयात काम करणाऱ्या प्रशासन अधिकाऱ्यांच्या लॉकरमध्ये एसीबीच्या अधिकाऱ्यांना १३ लाख रुपये उगाच सापडत नाहीत. मी ही गोष्ट बाहेर बोललो, सभागृहात सुद्धा हे मी सांगितलेले आहे.

**५१.** नेट-सेट पात्रता नसलेल्या साऱ्या शिक्षकांना एका गटातील समजून वागणूक देता येणार नाही. पहिला गट १९९१ ते १९९९ या काळातील आहे ज्यांना ही पात्रता कायद्याने लागूच केलेली नव्हती हे एक व त्यांच्या नेमणूकासुद्धा तदर्थ नसून आज कायमस्वरुपी झालेल्या आहेत. त्यांची विधिवतरित्या निवडसमितीमार्फत निवड झाली होती व ते विधिमय पात्रता धारक सुद्धा होते. दुसरा गट डिसेंबर १९९९ नंतरच्या काळातील आहे. त्यांच्या नेमणूका जरुर नियमित करुन घ्याव्या लागतील.

**५२.** गेल्या १५-२० वर्षापासून नोकरशाहीचा खेळ उघड्या डोळ्यांने पहात असलेला एक विधीमंडळ सदस्य या नात्याने या पत्राची भाषा थोडीशी कठोर झाली हे मी मान्य करतो पण त्याचबरोबर हेहि नमूद करतो की त्याबद्दल मला वाईट वाटत नसून यापेक्षा कठोर भाषा आपल्याला वापरता येत नाही याबद्दल वाईट वाटत आहे. डिसेंबर अधिवेशनापूर्वी आपणास जे करता आले नाही ते निदान मार्च अधिवेशनापूर्वी आपल्याला करता यावे यासाठी मनापासून मी आपणास शुभेच्छा देत आहे.

आपला विनित,

**(बी.टी.देशमुख)**

विधानपरिषद सदस्य

**नुटाच्या आमसभेच्या वेळी करावयाच्या व्यवस्थेसंबंधी सूचना**

आमसभा ठरलेल्या वेळी म्हणजे बरोबर दुपारी १२.०० वाजता सुरु होत असते, हे लक्षात ठेऊनच एकूण व्यवस्था असावी. सभा सुरु होण्याच्या पूर्वीच्या एक तासात सर्व सदस्य आपापल्या सोबत आणलेल्या जेवणाच्या डब्यांचा एकमेकासोबत आस्वाद घेत असतांना त्यांच्या बसण्यासाठी बगीच्यात, झाडाखाली, सावलीत किंवा उन असल्यास खोल्यातून स्वच्छतायुक्त व्यवस्था व सोबत पिण्याच्या पाण्याची निट व्यवस्था ही आमसभेच्या आयोजकांनी करावी एवढीच याबाबत अपेक्षा असते. - **डॉ.एकनाथ कठाळे, सचिव, नुटा**

(PR : P 62 OF 2002 EX-FILE)

## BUDGET FOR THE FINANCIAL YEAR - 2009-2010

OFFICIAL ACCOUNTING YEAR OF THE TRUST : 2009-2010 (AS PER SCHEDULE VII-A OF THE B.P.T.A. 1950)

***Name of the Trust*** **: NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION.**

Regn. of the Trust : B.P.T.A. Regn. No. F-1594 & Soc. Regn. Act. Regn. No. MAH-15-73(NGP)

| ESTIMATED RECEIPTS | RS. P. |
|---|---|
| **I. OPENING BALANCE :** | |
| i) Cash in hand … … | … .. |
| ii) Cash in Bank … … | 10,000 00 |
| **II. ESTIMATED RECEIPTS :** | |
| **(A) NON RECURRING** | |
| i) Ordinary Donations to be received for specific earmarked objects (permanent subscription to NUTA Bulletin) … … | … .. |
| ii) Ordinary Donations… | … .. |
| **(B) RECURRING :** | |
| i ) Rent etc. on immovable property | … .. |
| ii) Interest on Fixed Deposits | 4,00,000 00 |
| iii) Dividend shares etc… … | .. |
| iv) Income from Agri. land … | … .. |
| v) Other revenue Receipt … | … .. |
| vi) Legal Aid Fund … | … .. |
| **III. REALISATION FROM DISPOSAL OF ASSETS :** | … .. |
| **IV EXCESS OF EXPENDITURE OVER INCOME :** … | … .. |
| **TOTAL Rs.** | **4,10,000.00** |

| ESTIMATED DISBURSEMENTS | Rs. P |
|---|---|
| **A) NON-RECURRING :** | |
| i) Major Repairs or rebuilding of the assets etc. … | .. . .. |
| ii) Net purchase of immovable property … | … .. |
| **B) RECURRING :** | |
| i) Rents, rates taxes etc. … | 10,000.00 |
| ii) Administrative Expenses … | … .. |
| a) Stationery, Typing , Cyclostyling & Printing . … | 2,70,000.00 |
| b) Travelling Expenses . … | 15,000.00 |
| c) Postage and Telephone. … | 15,000.00 |
| d) Misc. expenses … | 10,000.00 |
| e) Bank commission … | 500.00 |
| f) Legal Expenses … | 1,000.00 |
| g) Audit fees … | 5,618.00 |
| h) Affiliation fees … | |
| i) MFUCTO … | 4,000.00 |
| ii) AIFUCTO … | 7,000.00 |
| iii) Contribution to public trust\ admn. Fund … | |
| vi) Books Library | 15,000.00 |
| iii) Payment of Salaries … | 9,600.00 |
| iv) Transfer of Depreciation Fund | |
| v) Special & Current repairs of building Furniture etc … | 10,000.00 |
| vi) Excess of income over expenditure … | 37,282.00 |
| **TOTAL Rs.** | **4,10,000.00** |

**NOTE** : Estimated enrolment of members during the year is expected to be 10. On this account the Association will receive an estimated amount of Rs. 1,00,010/- However this amount cannot be included in the estimated receipts because this amount is to be invested in fixed deposit receipts or any other Govt. Securities as per Artcle III of the Constitution . - Sd. **S. A. Tiwari**, Treasurer.NUTA

# नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना स्पष्टीकरण

## महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

**शासन परिपत्रक क्रमांक : अंनियो १००९/१३/सेवा-४ : मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक - २४ फेब्रुवारी २००९**

**वाचा : शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक : अंनियो १००६/८७/सेवा ४, दिनांक १२ जानेवारी २००७**

## परिपत्रक

"वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रं. अंनियो १००६/८७/सेवा-४, दिनांक १२.१.२००७" मधील परिच्छेद क्र. २ संदर्भात शासन खालील प्रमाणे खुलासा करीत आहे. :-

दिनांक १.११.२००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर असलेल्या ज्या शासकीय कर्मचाऱ्यांने त्याच किंवा अन्य विभागातील निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेच्या पदावर **दि. १.११.२००५ पुर्वी अर्ज केला असेल आणि त्याला दि. १.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नवीन पदावर नियुक्त करण्यात आले असेल** अशा प्रकरणी वित्त विभाग परिपत्रक क्र. अंनियो १००६/८७/सेवा-४, दिनांक १२.०१.२००७ मधील सर्व अटींची पूर्तता होत असल्यासच संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीनेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील. म्हणजेच सेवेत असलेल्या ज्या कर्मचाऱ्यांनी दुसऱ्या पदासाठी दि. **१.११.२००५ पूर्वी अर्ज केला नसेल त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल.**"

२. सेवेत असलेल्या ज्या कर्मचाऱ्यांनी दुसऱ्या पदासाठी दि. १.११.२००५ पूर्वी अर्ज केलेला नसतांना अशा कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्याचे आदेश काढण्यात आले असल्यास **संबंधित आदेश तात्काळ रद्द करण्यात यावेत** व अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या नवीन पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील असे **सुधारित आदेश निर्गमित करण्यात यावेत.**

३. मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालयात दि. १.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या व परि. १ मध्ये नमूद केलेली अट पूर्ण करत नसलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु करण्यात आल्याचे प्रमाणपत्र मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या विभाग प्रमुखांनी हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत या विभागाकडे सादर करावे.

४. वरील स्पष्टीकरण जिल्हा परिषदा तसेच ज्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी लागू आहे, अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषित्तर विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे इत्यादींच्या सेवेमध्ये १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी, योग्य त्या फेरफारांसह लागू ठरेल.

५. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २००९०३०३११५८४६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**नि.बा. वाडेकर**
शासनाचे उपसचिव

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**
B.P.T.A Regn. No. F-1564 & Soc. Regn.Act
(Regn No. MAH/15/73 (NAG)

**Dr.E.H.Kathale,** Secretary, **NUTA,** N-162, ReshimBagh, Nagpur-440 009.

No. 3/S/2008 : Date : 06.03.2009 :
By Registered Post Nagpur GPO- 440 001

To,
The Deputy Charity Commissioner, Nagpur Region, Nagpur.

Subject : Submission of Statements of Accounts of Nagpur University Teachers' Association, Nagpur for the year ending on 31st March, 2008.

Sir,

Please find herewith enclosed original audited Statements of Accounts of Nagpur University Teachers' Association, Nagpur for the year ending on 31st March, 2008.

Kindly do the needful at your end and oblige.

Yours faithfully,
(Dr. E.H.Kathale)
Secretary, NUTA.

***Encl :*** *Audited statement of accounts.*

***Copy to :*** *(1) Prof. B.T.Deshmukh President, NUTA, Amravati. (2) Prof.S.A.Tiwari, Treasurer, NUTA, Amravati.*

***Note :*** *This letter was sent to the Deputy Charity Commissioner By Registered Post from Nagpur GPO 440 001 SPEM 121177712 IN counter No. 2, OP code : SSP : 40 grams, Amount 12.00 on 06.03.2009 at 15.37 Hrs.*

**RULES FOR PROPOSING AMENDMENTS**
**(Reproduced from page 97 of 1977 NUTA Bulletin )**

1. Any proposal before the meeting may be amended (a) by leaving out a word or words or (b) by leaving out a word or words in order to add or insert a word or words or (c) by adding or inserting a word or words.
2. An amendment to be in order shall : (a) not constitute a direct negative to the original resolution : (b) be relevent to and within the scope of the resolution to which it is moved.

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO. MAHBIL/2001/4448** Postal Registration No. ATI/RNP/78/2005-08 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/2005-08 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **02.04.2009**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

To,........................................................................
...............................................................................
...............................................................................
...............................................................................
...............................................................................